परमपिता परमात्मा त्रिमूर्ती शिवभगवानुवाच 'मन्मनाभव'।

# अमृत कुंभ

## अंतरंग

वर्ष १८, अंक ५. डिसेंबर २०२४ – जानेवारी २०२५




१. संपादकीय – अलौकिक कहाणी – ब्रह्माबाबांची २
२. बाबांची मधुर मुरली ४
३. आत्मविश्वास ४
४. शतायु रुक्मिणी दादीजी ५
५. स्वास्थ्य तुमच्या हातात ८
६. पहिल्याच भेटीत बाबांनी आपलेसे केले ९
७. शौर्याचे किंवा धाडसाचे अनेक प्रकार... ११
८. देव सन्निध आहे १३
९. अंतर्मनाची अद्भुत शक्ती १४
१०. सत्य घटना – जेव्हा गावात पाण्याचा खडखडाट होता १६
११. परीकथा (भाग १६) १८
१२. छाटणी २०
१३. योगात संकल्प शक्तीचा उपयोग कसा करावा? २१
१४. चालविसी हाती धरोनिया २४


## मुखपृष्ठाविषयी

'योगस्थ: कुरू कर्माणि' अशी गीतेची शिकवण आहे. योग म्हणजे जोडणे, बुद्धी निराकार शिवाशी जोडणे म्हणजे राजयोग. शिवपित्याने हे ज्ञान ब्रह्मा बाबांच्या द्वारे सर्वांना दिले. त्या दिव्य ज्ञानाचे प्रत्यक्ष कर्मातील रुप ब्रह्मा बाबांनी दाखविले. पत्र लिहिण्यासारखे एखादे नित्यकर्म असो वा अन्य कुठलेही, ते योगयुक्त होऊन कसे करायचे हे बाबांनी स्वतःच्या जीवनातून उदाहरण म्हणून सर्वांसमोर मांडले. नुसते कर्म करणे नव्हे, तर कर्मकुशलही कसे बनायचे ते शिकवले. योगी जीवनाची फलश्रुती आहे – संपूर्ण पावन बनणे. जसे एखादे कमलपुष्प असावे तसे.

१८ जाने.१९६९ या दिवशी ब्रह्माबाबांनी आपली संपूर्णत्वाची उंची गाठली आणि नश्वर देह त्यागला. या सगळ्याची आठवण मुखपृष्ठात सामावली आहे.

– प्रकाशिका


**फोटो, लेख इत्यादी पाठविण्याचा पत्ता :**
संपादक – अमृतकुंभ, द्वारा : प्रजापिता ब्रह्माकुमारीज्
ए–१०, वर्षा अपार्टमेंट, छत्रपती शिवाजी सोसायटी,
कोपरी कॉलनी, ठाणे (पूर्व)–४००६०३
फोन : ०२२–२५३२२२०८
E-mail : info@amrutkumbh.com



**वर्गणी पाठविण्याचा पत्ता :**
ब्र. कु. गोदावरी, प्रकाशक अमृतकुंभ
द्वारा : प्रजापिता ब्रह्माकुमारीज्, ए–१०, वर्षा अपार्टमेंट,
छत्रपती शिवाजी सोसायटी, कोपरी कॉलनी,
ठाणे (पूर्व) –४००६०३ मोबाईल : ९८२००२३०९२



Printed, published by B.K.Godavari on behalf of Prajapita Brahmakumaris Ishwariya Vishwa Vidyalaya. Printed at Perfect Prints, 22, Jyoti Industrial Estate, Nooribaba Dargah Road, Near Makhmali Talao, Thane (west), Pin 400601. Published at Prajapita Brahmakumaris Light House, Wagle Estate, Thane (west), Pin - 400604, Maharashtra. Editor : Mr. Sachin Vinayak Upadhye

वार्षिक वर्गणी रु. ८५/–, आजीव सभासद वर्गणी रु. १,५००/–, एका अंकाचे रु. १४/–

E-magazine साठी पुढील संकेतस्थळाला (वेबसाईटला) भेट द्या – www.amrutkumbh.com



संपादकीय ....

# अलौकिक कहाणी - ब्रह्माबाबांची

या जगात कुणाची आठवण लोकं काढतात? ज्यांनी जगाला काही दिलं, निःस्वार्थ भावनेने दिलं अशा मंडळींची आठवण नेहमी काढली जाते. यात, समाजसुधारक, राजकीय नेते, शास्त्रज्ञ, आध्यात्मिक नेते वा गुरू अशा अनेकांचा समावेश करता येईल. जितका गुणांचा समुच्चय जास्त तितके ते व्यक्तिमत्त्व अधिक प्रभावी असे सोपे सूत्र आहे. माणसाच्या अंतरंगात उमटणारी आध्यात्मिक प्रकंपने जितकी अधिक तीव्र तितका तो समाजावर अधिक गहिरा प्रभाव ठेवून जातो. अशाच एका महान व्यक्तीचे नाव - ब्रह्माबाबा. ब्रह्माकुमारीज संस्थेची पायाभरणी ज्यांच्याद्वारे झाली ते पितृवत्, ऋषितुल्य व्यक्तिमत्त्व.

ब्रह्मा बाबांचे मूळ नाव 'दादा लेखराज'. १५ डिसेंबर १८७६ या दिवशी त्यांचा सिंध हैदराबाद येथे जन्म झाला. खूबचंद कृपलानी यांना तिसरे पुत्र अपत्य झाले त्याचे नाव 'लेखराज' ठेवण्यात आले. पिता 'खूबचंद कृपलानी' एक साधारण शिक्षक होते. गावात त्यांना फार मान होता. एक सत्शील आणि शांत, मनमिळाऊ शिक्षक असा त्यांचा लौकिक होता. दादा लेखराज आपल्या पित्याच्या विषयीची आठवण सांगताना म्हणत, 'माझे वडील आम्हा मुलांना कधीही रागावले नाहीत.' कालपटावर आपण जवळजवळ दीडशे वर्षे मागे जाऊन विचार करायचा आहे. 'छडी लागे छम छम विद्या येई घम घम' अशा समजुतीच्या काळात एखादा प्रेमळ शिक्षक लाभणे म्हणजे 'कपिला षष्ठीचा योग' असावा तसे आहे. दादा लेखराजही तशाच स्वभावाचे निपजले. एक गुणी मुलगा म्हणून घरात ओळखले जाऊ लागले. दादांच्या घरातील वातावरण भक्तिमय असे. सिंध प्रांतातील 'भाईबंद' सिंधी समाजात अनेकजण श्रीविष्णूचे उपासक होते म्हणजेच वैष्णव किंवा वल्लभाचारी पंथाचे अनुयायी होते. श्रीविष्णू हेच इष्ट दैवत आणि शुद्ध द्वैतवादाचे अनुसरण हा त्यांचा मार्ग होता. दादा लेखराज स्वाभाविकरीत्या या मार्गाकडे आकृष्ट झाले होते. वयाच्या दहा वर्षाच्या आसपास दादा लेखराजांच्या अंगभूत गुणांमुळे त्यांच्याकडे एक गुरुद्वारा सांभाळण्याची जबाबदारी देण्यात आली. इतक्या लहान वयात अशी मोठी जबाबदारी फार कमी लोकांना मिळते हे सुजाण वाचक नक्कीच मान्य करतील.

वर उल्लेख केल्याप्रमाणे दादांना दोन मोठे भाऊही होते; पण जन-मानसात दादा ही उपाधी त्यांना लाभली त्यामागेही त्यांच्या स्वभावातील पोक्तपणा कारणीभूत होता. हस्तिदंताचा व्यापार करणाऱ्या 'काका मूलचंद' यांच्या सान्निध्याचाही दादा लेखराजांच्या घडणीवर मोठा प्रभाव पडला असावा. दादा, स्वभावतः दानी होते. विशेषकरून अडल्या - नडलेल्याना मदत केल्यावाचून त्यांना राहवत नसे. 'त्वरित दान महापुण्य' ही त्यांची जीवनशैली होती. त्यांची ज्ञानपिपासा इतकी होती की आयुष्यात त्यांनी बारा गुरू केले. साधारणपणे सामान्य माणूस एकदा गुरु केल्यावर पुन्हा गुरू करत नाही; पण दादा अलौकिक अपवाद होते. गुरुचे बोलावणे म्हणजे साक्षात् कळिकाळाचेच बोलावणे समजून गुरुची आज्ञा सदैव शिरोधार्य मानत. एकदा त्यांच्या गुरूने २५००० रुपयांची मागणी केली ती त्यांनी तत्काळ पूर्ण केली. त्याकाळच्या इतक्या मोठ्या रकमेचा आजच्या रुपयात विचार करता आकडा किती मोठा होईल याचा अंदाज लावून पहा. जीवितार्थासाठी त्यांनी अनेक छोटे-मोठे व्यवसाय केले आणि वयाच्या अगदी लवकरच्या काळात हिरे-जवाहिऱ्याच्या व्यापारात प्रगत होत गेले. ज्या पेढीवर ते काम करत तिथेच ते भागीदार म्हणून काम करू लागले आणि तत्कालीन सिंध समाजात एक सच्चा व्यापारी म्हणून

त्यांचा नावलौकिक झाला. व्यापाराच्या निमित्ताने साहजिकच त्यांची ऊठ-बस त्याकाळच्या संस्थानिक आणि राजे-महाराजांसोबत होऊ लागली. व्यवसायातील एक भाग म्हणून कधी मेजवानी आयोजित केली तरी त्यात मद्य, मांसाहाराचा समावेश नसे. आलेले पाहुणे सामिष खाणे न मिळाल्याने नाराजी व्यक्त करत; पण ते म्हणत जी गोष्ट मी खात नाही ती मी तुम्हाला कशी खाऊ घालू? असे नैतिक धैर्य दाखविणारा व्यापारी विरळाच. अन्यथा 'ग्राहकाचा संतोष...' अशी भूमिका अनेकजण घेताना आपण पाहतो अलीकडच्या काळात.

एखाद्याकडे नैतिक बळ असेल, तर ते नुसते चेहऱ्यावरच झळकते असे नाही, तर ते देहबोलीत उतरते. त्यांचे व्यक्तिमत्त्व किती प्रभावी असावे? हे एक उदाहरण पहा. एकदा काश्मिरच्या राजाच्या दरबारात ते आपल्या लहान मुलासह 'नारायणासह' गेले असता दरबारात प्रवेश केल्यावर त्यांना पाहून राजा सिंहासनावर बसलेला नकळत उभा राहिला. मग तो वरमला. आपण राजा आहोत हेही भान त्यास राहिले नाही. एक चुंबकीय आकर्षण होते, तेज होते आणि ते लपत नसे. अनेकदा अनोळखी लोकं त्यांच्या घरापाशी येऊन उगाचच घुटमळत, बसून राहत. दादा बाहेर येऊन विचारत काय हवंय तर ते म्हणत, 'काही नाही तुमच्या ओटीवर बसलं की बरं वाटतं'. हेच ते सुप्त आध्यात्मिक तरंग.

काळ पुढे सरत होता. दादांची साठी आली आणि त्याच्या जीवनातील दडलेला वैराग्याचा झरा उसळून बाहेर येऊ पाहत होता. दिवसेंदिवस किफायतशीर बनणाऱ्या व्यापारातील त्यांचे मन उडू लागले. ते एकांतप्रिय झाले. वाराणसीला सहा महिने जाऊन राहिले. चिंतनमग्न होत गेले. यात भर पडली काही साक्षात्कारांची. श्रीविष्णूंचा साक्षात्कार झाला. जणू श्रीविष्णू म्हणतायत 'तू आणि मी एकच आहोत. तुला या सृष्टीपरिवर्तनाचा विडा उचलायचाय'. एकीकडे अत्यानंद आणि दुसरीकडे या गूढ वाणीची उकल कशी करायची त्याबद्दलचे प्रश्नचिन्ह अशा आंदोलनात दिवस जात होते. एके दिवशी गुरूंसमोर प्रवचन ऐकायला बसलेले असताना त्यांना अद्भुत प्रेरणा झाली आणि ते बाजूच्याच खोलीत गेले. त्यांच्या चेहऱ्यावर दिव्य तेज पसरले. मुखातून सहजच शब्द बाहेर आले 'निजानंद स्वरूपम् शिवोऽहम शिवोऽहम, ज्ञानस्वरूपम् शिवोऽहम शिवोऽहम, प्रकाशस्वरूपम् शिवोऽहम शिवोऽहम'. निराकार शिवपित्याने त्यांच्या द्वारे आपली ओळख पहिल्यांदा करून दिली तीच ती मंगल घटिका. तिथून पुढे त्यांचे जीवनच पालटले.

व्यापार सोडला, भागीदारी विसर्जित केली. अनेकांनी त्यांची समजूत काढण्याचा प्रयत्न केला; पण ते मनात म्हणत असावेत 'जो तो सांगे ज्याला त्याला, वेड लागले राधेला...' शिवपित्याने त्यांचे नामकरण केले 'प्रजापिता ब्रह्मा'. त्यांच्या मुखाद्वारे शिवाने आपले दिव्य ज्ञान प्रकट करायला सुरुवात केली आणि ऐकायला येणाऱ्यांची गर्दी उसळू लागली. सत्संगाचे रूप आले त्या कृतीला. ॐ उच्चारण करून सत्संगाची सुरुवात होई म्हणून त्याला ॐ मंडळी असे नाव पडले. जो ब्रह्माबाबांना पाही त्याला इष्ट देव -देवतांचा साक्षात्कार होई किंवा निराकार रूपाचे दर्शन होई. येणाऱ्या भाविकांमध्ये माता-भगिनींची संख्या फार अधिक होती. याचा एक परिणाम असाही झाला की लोकं भलते-सलते अर्थ काढू लागले. शिवपित्याने त्यांच्याद्वारे सांगितलेल्या ज्ञानात प्रमुख गोष्ट होती, काया-वाचा-मनाने ब्रह्मचर्य पालन. पुण्यस्य फलमिच्छन्ति पुण्यं नेच्छन्ति मानवाः । न पापफलमिच्छन्ति पापं कुर्वन्ति यत्नतः ।। या न्यायानुसार लोकांना आध्यात्मिक उन्नतीसाठी ब्रह्मचर्यपालन मात्र नको होते. याचा परिणाम म्हणजे ॐ मंडळीला विरोध होऊ लागला. कोर्टात दावे दाखल केले गेले. सत्संगाला आग लावायचा प्रयत्न झाला, तिथे जाणाऱ्या माता-भगिनींना अनेक शारीरिक आणि मानसिक अत्याचारांना सामोरे जावे लागले. अशा परिस्थितीतही बाबांच्या मनातील करुणा भाव बदलला नाही. कुणाचे कार्य आहे आणि कोण हे ज्ञान सांगत आहे हे न जाणल्याने हे बिचारे विरोध करतायत ही ममत्वाची दृष्टी बाबांनी ठेवली. एकीकडे असा प्रखर विरोध आणि दुसरीकडे आपली आंतरिक साधना. 'मी देह नसून एक ज्योतिर्बिंदू आत्मा आहे असा अभ्यास करत मन-बुद्धी निराकारावर एकाग्र करणे म्हणजेच 'राजयोग'. याचा अभ्यास बाबांनी स्वतः रात्रं -दिवस केला आणि सत्संगातील प्रत्येकाकडून करवून घेतला.

ही सगळी धामधूम सिंध कराचीत घडली आणि त्यादरम्यान फाळणी झाली. ५ मे १९५० रोजी संस्था भारतात आली. अरावली पर्वतरांगात वसलेल्या आबूमध्ये संस्था स्थिरावली

आणि तिथेच मुख्यालय सुनिश्चित झाले. एकेकाळी धनाढ्य असलेल्या बाबांना आणि सत्संगाला आर्थिक चणचणीलाही तोंड द्यावे लागले. सखोल विचार केला तर जाणवते, हे सगळे वयाची पंच्च्याहत्तरी पार केल्यावर झेलणे येरागबाळ्याचे काम नव्हते. बाबांनी शिवपित्याला आपल्या जीवनाचे सारथ्य दिले होते आणि स्वतःला अर्जुनाप्रमाणे परम तप करण्यात गुंतवले होते. अर्जुनाचे एक नाव गुडाकेश आहे. गुडाका म्हणजे निद्रा, निद्रजीत बनून राजयोगाची गहन साधना करत राहिले. राजयोगी जीवन कसे असावे याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे बाबांचे चरित्र होते. 'सीदन्ति मम गात्राणि' असे म्हणणारा अर्जुन न बनता 'स्थितोऽस्मि गत सन्देहः करिष्ये वचनं तव' म्हणणाऱ्या अर्जुनाचे सजीव रूप काय असते ते बाबांनी दाखविले. एका साध्या पर्णकुटीत राहून साधना करत सर्व यज्ञवत्सांना मार्गदर्शन केले. शिवपित्याच्या आज्ञेचे प्रत्यक्ष पालन कसे करायचे ते सोदाहरण दर्शविले. नष्टोमोहः स्थिती काय असते त्याचे मोठे उदाहरण बाबा स्वतः होते. त्यांच्या पत्नीने (जसोदा मातांनी) ज्यावेळेस देह ठेवला तेव्हा त्यांच्या मुखातून अनाहूतपणे शब्द निघाले, 'ईश्वराच्या ह्या पुत्रीने देह ठेवला तरी ज्ञानरूपी मेवा चाखण्यात खंड पडता कामा नये.' 'आणि जगाचिया सुखोद्देशें। शरीरें वाचा मानसें । राहटणे ते अहिंसे । रूप जाण'(ज्ञाने. अ . १६, ओ. ११४) या ओवीप्रमाणे बाबांनी आपले जीवन सर्वांच्या उन्नतीसाठी झिजवले, जणू दधिची ऋषीच बनले. 'इवलेसे रोप लावियले द्वारी त्याचा वेलू गेला गगनावरी' तसे आज संस्थेच्या १४० देशात ८००० हून अधिक शाखा समाजाला उन्नत करण्यासाठी राजयोगाची साधना शिकवत आहेत. कुठल्याही धर्मपित्यापेक्षा किंवा संत महात्म्यापेक्षा आगळे वेगळे जीवन ब्रह्माबाबा जगले. खऱ्या अर्थाने ही अलौकिक कहाणी आहे तिची अवीट गोडी चाखावी तितकी थोडीच !

***

## बाबांची मधुर मुरली

बाबांची मधुर मुरली
पवित्रतेने भरली
जीवन बदलून गेले
बाबा तुझ्या घरी आले
वेडी झाले वेडी झाले
बाबा तुझ्या घरी आले

बाबाचे सुंदर धाम
नाव त्याचे परमधाम
शांती सागरी डोलू लागले
बाबा तुझ्या घरी आले
वेडी झाले वेडी झाले
बाबा तुझ्या घरी आले

बाबांचे ध्यान करून
योगधारणा सेवा करून
सत्य युगात मी रमले
बाबा तुझ्या घरी आले
वेडी झाले वेडी झाले
बाबा तुझ्या घरी आली

ब्र.कु. लता, देगलूर

## आत्मविश्वास

मृदुलला एक साधू बाबा भेटले. ते म्हणाले, ''आयुष्याचा प्रत्येक क्षण एक अनमोल भेटवस्तू आहे. हे तू जाणशील, तर तुला आयुष्यात जे हवे ते मिळेलच! मृदुल, म्हणाला, 'बाबा, नाही हो असे काहीच होत नाही. मी आयुष्यात अक्षरशः ढोर मेहनत करतोय. तरी यशाचे तोंड बघू शकत नाही. प्रत्येक वेळी अपयशच माझ्या नशिबी येते. बाबा म्हणाले, 'चुकतोयस तू बाळा. हेच जीवनाचे सत्य आहे.' 'तूच स्वतःच्या जीवनाचा शिल्पकार आहेस.' असे म्हणून त्यांनी आपल्या झोळीतून एक चमकदार दगड काढून मृदुलच्या हातावर ठेवला. 'मुला आतापासून प्रत्येक काम करताना हा दगड तू आपल्या बरोबर ठेव. ह्याची तुला फार मदत होईल, प्रत्येक वेळी. मृदुलने 'बघू' असे म्हणून तो दगड घेतला.

मृदुल आता प्रत्येक काम करताना तो दगड खिशात ठेवायला लागला. बघता बघता चमत्कारच झाला. ज्या कामात हात घालेल, तिथे यश मिळायला लागले. तसा तो धावतच बाबांकडे गेला, त्यांना हा चमत्कार सांगू लागला. बाबा हसून म्हणाले – ''बाळा तो एक साधारण दगड आहे. त्यात अशी कोणतीही शक्ती नाही बरं का! तसेच माझ्याजवळही तुला देण्यासारखी कुठलीच शक्ती नाही. सर्व सकारात्मक शक्ती तुझ्यातच भरलेली आहे. फक्त तू त्या शक्तीला नकारात्मक शक्तींनी पूर्णपणे झाकले होते. मी दिलेल्या दगडाने तर फक्त तुझ्यातील आत्मविश्वास दृढ केला. म्हणूनच अडचणींच्या काळातही तू सकारात्मक विचार करू लागलास. कामात मन लावल्यानेच आज यश तुझ्या पायाशी आले आहे.''

– ब्र.कु. बाळू, सोलापूर



# शतायु रुक्मिणी दादीजी

ब्र.कु. हेमंत, शांतिवन

एळाद्या संस्थेने किंवा व्यक्तिने वयाची २५ वर्षे पूर्ण केली तर रौप्य महोत्सव साजरा केला जातो. तसेच पन्नास वर्ष पूर्ण झाली तर स्वर्ण जयंती, साठव्या वर्षी हीरक जयंती, पंच्याहत्तराव्या वर्षी अमृतमहोत्सव व शंभराव्या वर्षी शताब्दी समारोह साजरा केला जातो. खरं तर शंभरी काही निवडक दुर्मीळ भाग्यवंतांनाच लाभते! अशा शंभर वसंत पाहणाऱ्या, दीर्घायु, ज्ञानमार्गात दहा दशकांची यशस्वी वाटचाल करत वयाचे शंभरावे शिखर गाठून जन्म व जीवन सार्थक करणाऱ्या, शतायु, पद्मापद्म सौभाग्यशाली प्रभुरत्न होत्या, 'राजयोगिनी दादी रुक्मिणीजी!' १०० वर्षांची सफल जीवन यात्रा पूर्ण केल्यावर दोन जानेवारी २०१९ रोजी शांतीवनच्या विशाल डायमंड हॉलमधे आणि त्या आधी ओमशांती रिट्रीट सेंटर गुडगांव (दिल्ली) येथे दादींचा शंभरावा वाढदिवस मोठ्या धामधूमीने साजरा करण्यात आला होता.

दादींचा लौकिक जन्म सिंध येथे एका संपन्न कुटुंबात १९ नोव्हेंबर १९१९ रोजी झाला. दादींचे आजोबा प्रसिध्द जवाहीर होते, तर पिता कपड्यांचे व्यापारी होते. पाच बहिणींमधील तिसऱ्या कन्यारत्नास वडील 'बादूरामजी' यांनी नाव दिलं 'रुक्मिणी' तर शिवपित्याने अव्यक्त नाव दिलं, 'गुल्जार शांता!' दादी रुक्मिणी, दादी ऑलराऊण्डरजींच्या लहान बहीण व दादी गुल्जारजींच्या लौकिक मावशी होत्या. शेवटपर्यंत रुक्मिणी दादी गुल्जार दादींच्या खांद्याला खांदा लावून दिल्ली सेवाक्षेत्राच्या संचालिका बनून सेवा करत राहिल्या. बालपणापासूनच दादी रुक्मिणीजी दिव्यबुद्धीची खाण होत्या, म्हणून त्या प्रत्येक कार्य खूप सुंदररित्या पूर्ण करीत. हायस्कूलच्या शिक्षणानंतर दादींनी ग्रॅज्युएशनमधे गोल्ड मेडल (स्वर्ण पदक) प्राप्त केलं. ज्ञानमार्गात यायच्या आधी दादी एक कुशल शिक्षिका व उत्तम पत्रकारही होत्या.

रुक्मिणी दादी एकदा हैद्राबादला लग्न समारंभात गेल्या होत्या. तेव्हा सिंध हैद्राबादमधे ओममंडलीविषयी चर्चा सर्वत्र होती. लोक म्हणत, ''इथे छान सत्संग चालतो, जो तिथे जातो त्यास शांती लाभते व साक्षात्कार होतो.'' दादींना सर्व कराचीवाले म्हणत. त्यांना नातेवाईक म्हणाले, ''कराचीवाले एकदा तरी सत्संगात अवश्य जाऊन पहा!'' मग दादींच्या मामी त्यांना सत्संगात घेऊन गेल्या. पहिल्याच दिवशी दादींनी तिथे काय पाहिलं? सत्संग चालू होता, ब्रह्माबाबा बसून ओमध्वनी करत होते, तो मंगलध्वनी ऐकताच दादी अशरीरी झाल्या, त्यांना काही कळलंच नाही. बाबांनी सत्संग पूर्ण केला. सारी सभा उठून गेली, पण दादी देहाची शुद्ध हरपून तिथेच बसून राहिल्या, सोबत आलेले आप्तेष्ट घाबरले, की दादींना काय झालं? त्यांनी हा समाचार बाबांना दिला, बाबा येऊन दादींच्या डोक्यावर हात फिरवत म्हणाले 'बेटी, बेटी!' ह्या आधी एकदा दादी आपल्या खोलीत लौकिक पिताच्या आठवणीत गुंग होऊन बसल्या होत्या, तेव्हा दादींनी दृगांमधे एक आकृती पाहिली व आवाज ऐकला, 'बेटी, बेटी!' दादींनी इकडे-तिकडे पाहिलं तर काहीच दिसलं नव्हतं, दादींना वाटलं जणु आकाशातून कुणीतरी बोलतंय. हेच ते प्रेमयुक्त बोल ब्रह्माबाबांच्या मुखातून दादींनी ऐकले. बाबांनी दादींना 'बेटी, बेटी!' म्हणून हाक मारली, तेव्हा दादींनी लगेच डोळे उघडले. त्यावेळी ब्रह्माबाबांना सर्व 'ओमदादा!' म्हणून संबोधत, बाबांची ओळख नसूनही दादी म्हणाल्या, 'बाबा, बाबा!' आणि बाबाही म्हणाले, 'बेटी, बेटी!', अन् दादींना वाटलं जणु हरवलेले पिता पुन्हा भेटले. दादींच्या वडिलांचा काही दिवसांपूर्वीच मृत्यू झाला होता. पितृवियोगाने दादींचे अश्रू थांबतच नव्हते. कुणालाही त्याच्या पित्यासोबत पाहिलं तर दादींच्या स्वतःच्या

वडिलांची आठवण येई. त्यांचे वडील जीवित होते तेव्हा दादींना कुणी एखाद्या कार्यक्रमात किंवा फिरायला बोलावलं तर त्या म्हणत, 'माझे वडील आले तर मी त्यांच्या सोबत जाईन.'

ब्रह्माबाबांनी दादींना दुसऱ्या दिवशी नाश्त्यासाठी यायचं निमंत्रण दिलं. बाबांनी दादींसोबत न्याहारी केली व दादींना पित्याचे निःस्वार्थ प्रेम लाभले. ब्रेकफास्ट नंतर बाबांनी स्वतः ज्ञान दिलं. बाबांनी वर्तुळाकार गोल आकाराच्या काचेवर तीन लोकाचं सुंदर चित्र काढून घेतलं होतं. चित्रात देवलोक, मनुष्य लोक आणि पाताळ लोक चित्रित केले होते. देवलोकात देवता, मनुष्य लोकामधे अर्जुनास श्रीकृष्ण ज्ञान देताना आणि पाताळ लोकात साप विंचू इत्यादी प्राणी दाखवले होते. बाबा, 'चांगले कर्म कराल तर देवलोकात जाल!' बाबांनी नंतर विचारलं, 'मुली तू कुठं जाशील? दादी म्हणाल्या, 'बाबा, मी तर देवलोकी जाईन!' ह्या प्रकारे दादींना ज्ञान प्राप्त झालं. काही दिवस हैद्राबादेत राहून दादी परत कराचीला गेल्या, तरीही दादी आणि ब्रह्माबाबांमधे पिता-पुत्रीचा संबंध पक्का राहिला. कराचीत दादींना रोज बाबांचं पत्र येई. बाबा गीत रचत, पत्राद्वारे ज्ञान देत. ह्या प्रकारे दादींच्या घरात सत्संग सुरू झाला. ज्ञानाच्या प्रभावाने दादींचं रडणं बंद झालं, हे परिवर्तन पाहून सर्व कुटुंबीय खुश झाले, अन् कराचीला यायचं ब्रह्माबाबांना निमंत्रण दिलं. बाबा काश्मीरला गेले होते. बाबा म्हणाले, 'काश्मीरहून परतल्यावर तुमच्या घरी येईन.' काश्मीरहून परतल्यावर बाबा, मम्मा, दादी शांतामणी आणि त्यांचे वडील रिजूमलजी हे सर्व रुक्मिणी दादींच्या घरी गेले आणि एक आठवडा राहिले. बाबांना कराची शहर खूप आवडलं. बाबा रोज क्लिफ्टनवर फिरायला जात, तिथे खेळ खेळत. बाबांनी लगेच बसही विकत घेतली. आठ दिवसातच हैद्राबाद सारखीच कराचीमधे सत्संगाची चर्चा होऊ लागली. सत्संगात साक्षात्कार होतात, फार सुखं मिळतं व खूप शांती लाभते. बाबा म्हणाले, 'तुमचं घर आता ओममंडळीची ब्रांच (शाखा) झाली,' त्या दिवसापासून ती शाखा चालू राहिली व नंतर मुंबई येथे स्थानांतरित झाली.

परमात्म्याशी सर्व संबंधांची अनुभूति करविणाऱ्या दादी रुक्मिणी एक सशक्त व्यक्तिमत्त्व होत्या. एकदा शाळेतून परत येत असताना, लौकिक बहीण ऑलरॉऊण्डर दादींनी पैसे देऊन दादींना हैद्राबादला पाठवलं, तिथे खूप गोंधळ चालला होता. दादी खूप मुश्किल गोष्टी पार करत रात्री एक वाजता हैद्राबादला पोहोचल्या. शांतामणी दादींच्या आईंनी त्यांना आत घेतलं. दुसऱ्या दिवशी त्या पिकेटिंग मधेही गेल्या. दादींच्या घरुन तार आली, 'आमची मुलगी तुमच्याकडे आलीय. तिला घरी पाठवा.' दादी हैद्राबादहून कराची कैंट स्टेशनला उतरुन सरळ ब्रह्माबाबांपाशी गेल्या. बाबा म्हणाले, 'सिंहीण मैदानात उतरली आहे ना!' नंतर दादी घरी जाऊन रात्री शांतपणे झोपी गेल्या, तेव्हा कुठे दुसऱ्या दिवशी घरच्यांचा राग शांत झाला!

आबूला आल्यानंतर आर्थिक चणचणीच्या वेळी बाबांनी दादींना दिल्लीला पाठवलं. मनोहर दादी स्टेशनवर घ्यायला आल्या व टांग्यात बसवून घेऊन गेल्या, तिथे एका छोट्याशा खोलीत दहा जण राहत होते, तिथेच क्लास होई, कोर्स होत व त्याच खोलीत कोरडं साधं जेवण जेवून सेवा करत. दादीनी सर्वात आधी कमलानगर दिल्ली येथे सेवा केली व तिथूनच ईश्वरी सेवेचा श्रीगणेश झाला. ब्रह्माबाबांनी दादींना जिथे जिथे पाठवलं, तिथे अनासक्त भावनेने दादींनी त्याग-तपस्येच्या बळावर सेवेचा पाया पक्का केला. दादी सेवार्थ अहमदाबाद, रांची, पटना, जयपूर, सहारनपूर व बीकानेर इत्यादी ठिकाणी गेल्या. सन १९५३ मधे अमृतसरचे प्रसिद्ध संन्यासी निर्मल स्वामींनी निमंत्रण दिलं. तिथे दादी जानकी व दादी रुक्मिणी दिल्लीहून गेल्या. आयोजकांनी फर्स्ट क्लास डब्यामधे शोधलं, पण त्या तर थर्डक्लास डब्यामधे होत्या. दादींचा साधेपणा पाहून आयोजकांवर खूप चांगला प्रभाव पडला. मम्मा-बाबांनी स्वतः दिल्ली रजोरी गार्डन येथे सेवाकेंद्राची स्थापना केली होती, तिथे रुक्मिणी दादींनी अखेर पर्यंत सेवा केली.

दिल्ली रजोरी गार्डन सेवाकेंद्राच्या शक्ति दीदी दादींची वैशिष्ट्ये सांगतात, 'मी १९७४ मधे दिल्ली पाण्डव भवन येथे १० कन्यांच्या ट्रेनिंग मधे आली होती. तेव्हा रुक्मिणी दादींनी क्लास केला-यज्ञस्नेही कसं बनायचं? क्लास करताना त्यांची नजर माझ्यावर पडली, मी दादींना भेटले अन् त्यांनी मला पसंत केलं. मग मधुबन मधे तीन महिने ट्रेनिंग झाली. प्रकाशमणी दादींनी मला रजोरी गार्डन येथे रुक्मिणी दादींपाशी पाठवलं. काटकसरतेच्या मूर्त रुक्मिणी दादी दाणा-दाणा सफल करत. त्या म्हणत, एक कणही मोहरे समान आहे, जर तो फुकट घालवला

तर त्याचे कर्ज आपल्यावरच होईल, व्यर्थ वस्तुंनाही बेस्ट बनवत. दादींमध्ये वकृत्वकला (भाषण), चित्रकला, पाककला, अध्ययन कार्य, शिवणकाम, सफाई इत्यादी अनेक वैशिष्ट्ये होती, मी त्यांची वैशिष्ट्ये पाहून शिकत गेले. दादीजी नैवेद्य दाखवल्यावरच भोजन करु देत, जर १० भाऊ आले असले व एकच आंबा असेल तर तो त्या दहाजणात वाटून देत. दादी यज्ञामधे छोट्या मुलांच्या नर्स होत्या. एकदा मी खूप आजारी होते, १०४ डिग्री तापामुळे मी कण्हत होते. माझा आवाज ऐकून दादी आल्या अन् पाय व डोकं दाबू लागल्या, मी नाही म्हटले तरी दादी म्हणाल्या, 'तुला इतका त्रास होतोय, तू आराम कर.' मी उलटी करायला जाऊ लागले तेव्हा दादींनी विचारलं, 'कुठे जातेय? मी म्हणाले, 'उलटी करायला.' त्या म्हणाल्या, 'माझ्या ओंजळीतच उलटी कर,' मग दादींनी भांडं आणून त्यात मला उलटी करविली. दादींनी लौकिक आईपेक्षाही जास्त संगोपन दिले. दादी दिल्ली झोन इंचार्ज होत्या, म्हणून सर्वत्र अथक होऊन फेरी मारत. दादी खूप शक्तिस्वरुपा होत्या. कुठेही प्राब्लेम असेल, तिथे दादींनाच बाबा पाठवत. दादींमधे विल पॉवर (इच्छाशक्ती) ही खूप होती. त्या पंतप्रधानांपर्यंत पोहचायलाही बिचकत नसत. एकदा टिचर्सच्या गोल्डन जुबलीमध्ये पंतप्रधान देवेगौडाजी आले होते. त्यावेळी मी १००० लोकांचं ब्रह्माभोजन बनवलं. ही यज्ञसेवा प्रेमाने व चिकाटीने करायचे संस्कार दादींनीच माझ्यात भरले होते. दादीजी स्वतःची सर्व कामें स्वतःच करत, कुणाकडून कधी सेवा करवून घेत नसत. दादी नियमांच्या खूप पक्क्या होत्या, कधी अमृतवेळा चुकवत नसत. कुणी मुरली मिस केली तर म्हणत, यांना नाश्ता देऊ नका, पण कुणी दिलाच तर म्हणत, 'यांना भोजन देऊ नका. दादींच्या सानिध्यात सर्वांना हलकं वाटे, रमणीक स्वभावाच्या रुक्मिणी दादी सर्वांशी हसून-खेळून हलकं होऊन व्यवहार करीत. त्या एखाद्याचा इशारा सहज समजत. दादींना कुणी एकदा जरी भेटलं तरी त्यांना आपलं बनवत.

दिल्ली रजोरी गार्डनच्या दीपा बहन दादींची वैशिष्ट्ये सांगतात, 'प्रकृती व लोंकानी घेतलेल्या परीक्षांमधे दादी उत्तीर्ण झाल्या. दादी नेहमी सत्याची कास धरत. प्रामाणिकपणा, सच्चाई-सफाई व निर्भयतेच्या अवतार असलेल्या रुक्मिणी दादींना 'धर्मराज' म्हणत. त्या कुणाच्या प्रभावात कधीच येत नसत. दादींनी सर्वांना नियम मर्यादा शिकवल्या. काटकसरीच्या द्वारे दादी दिल्लीहून मधुकरी (धन) जमा करुन मधुबनला पाठवत. हंगामातील नवे फळ व व भाजीही आधी मधुबनला पाठवत, नंतरच स्वतः स्वीकारत. कुणाची बुद्धी संकुचित स्वरुपात किंवा स्वतःत न फसवता, सर्वांना बाबा व यज्ञाशी जोडत. दादी सर्वांशी एक सारखा व्यवहार करत, सर्वांवर विश्वास ठेवून सकारात्मक राहत. एखादी बहीण कुठेही सेट होत नसत, त्यांना दादी योग्य ठिकाणी सेट करत. त्या म्हणत, 'कोणतीही व्यक्ती शेवटच्या क्षणीही बदलू शकते, म्हणून कुणाविषयीही निगेटिव्ह विचार करु नका.' ज्यांना नाऊमेद करुन इतरांनी भटकवलं, त्यांना दादींनी सेट केलं, ते आज मोठ-मोठ्या सेवा करण्यास निमित्त बनले. दादी नियमांच्या खूप पक्क्या होत्या. शरीर सोडायच्या आधीच्या रात्री दादी म्हणाल्या, 'माझे हात-पाय धुवून, कपडे बदला.' शंभर वर्षाच्या वयातही दादी प्रत्येक नियम मर्यादेचं पालन करुन श्रीमतावर शंभर टक्के चालल्या. दादींनी स्वतःवर खर्च केला नाही. एका छोट्याशा खोलीत, अगदी तोडक्या-मोडक्या जुन्या वस्तु वापरल्या, दादी म्हणत, 'ब्रह्माबाबांनी झोपडी सोडली नाही तर मी का म्हणून नव्या वस्तु घेऊ, आता त्याग केला तर भविष्यात मिळेल।' दादींनी कधीच तोकड्या मान-सन्मानाची इच्छा केली नाही, ना कधी स्वतःचा फोटो काढू दिला. दादी सर्वांचे गुण पारखून सेवेत लावत. दादींची स्मरणशक्ती खूपच पक्की होती. दादींचा मंत्र होता, 'अब नहीं तो कब नहीं, जे करायचे, ते आताच करा, उद्याचा काय भरोसा?'

अखेरच्या दिवसांत दादींचं स्वास्थ्य ठीक नव्हतं, म्हणून त्यांना अहमदाबाद हॉस्पिटल मधे एडमिट केलं होत. परंतु दादींच्या हृदयात तर बाबा आणि मधुबनच वसलं होतं. दादींच्या तीव्र आग्रहामुळे त्यांना १६ जानेवारीला ग्लोबल हॉस्पिटल मधे घेऊन आले. दादींचे ब्रह्माबाबांवर अति-अति अंतःकरणापासून प्रेम होतं. म्हणून अजोड प्रेमाची पावती देत दादींनी स्वतःच्या अव्यक्त आरोहणासाठी अव्यक्त जानेवारी महिनाच निवडला आणि ब्रह्माबाबांचा अव्यक्त दिवस १८ जानेवारीच्या एक दिवस आधी - १७ जानेवारी २०१९ ला अगदी सकाळी-सकाळी १२.३३ वाजता स्थूल देहाचा त्याग केला आणि ब्रह्माबाबांसारखं देवदूत बनून त्या सूक्ष्मवतनवासी अव्यक्त सम्पूर्ण ब्रह्माबाबांच्या सहयोगी-सेवासाथी बनल्या. ***



# स्वास्थ्य तुमच्या हातात

ब्र.कु. डॉ. सज्जला जोशी
आयुर्वेदा फिजिशियन, पंचकर्म एक्सपर्ट, मा. आबू राजस्थान

**"ब्राह्म मुहूर्ताला उठण्याचे फायदे"**

**ब्राह्ममुहुर्ताचे रहस्य**

आज आपण आपली दिनचर्या कशी असावी हे जाणून घेणार आहोत. तुम्हाला सांगते आपली दिनचर्या ही रात्रीचर्या म्हणजे रात्रीच्या स्थितीवर अवलंबून असते. म्हणजे रात्री आपण काय जेवतो, किती वाजता जेवतो, झोपतो, काय बघून झोपतो, कोणत्या विचारांत झोपतो यानुसार पुढील दिवसाची सुरुवात होत असते. तर आज पण दिनचर्येची वेगवेगळी कर्म कोणती ती जाणून घेऊयात. उदा. ब्राह्ममुहूर्तावर उठायचे. पण ते कसे, कधी, कुणी उठायचे? त्यानंतरची पायरी उषःपानाची आहे. उषःपान म्हणजे सकाळी उठून पाणी पिणे, मग ते कुणी, किती, कसे प्यावे? उषःपानानंतर मलविसर्जन तेही कसे असावे, त्याची प्रक्रिया कशी असावी? मग दंतधावन विधी–दात कसे घासावेत, ही छोटी छोटी कर्मे आहेत. त्याबद्दल आज आपण माहिती घेणार आहोत. तसेच मुखप्रक्षालन, अभ्यंग स्नान कसे करायचे, शरीराला तेल लावून मालीश करणे, मग स्नान करणे ह्यालाच अभ्यंग स्नान असे म्हणतात. ते कसे करावे, पाणी कोणते वापरावे, स्नानादि कर्मे आटोपल्यावर आचमन कसे घ्यावे? अल्पोपाहार, न्याहारी कशाप्रकारे करावी, त्यात काय खावे? ह्याचाही उहापोह आज आपण घेणार आहोत. सॅलड कुणी खावे, अंकुरित कुणाला पचते, पाणी कधी प्यावे, दुपारच्या जेवणात काय खायला हवे, रात्री काय खावे, ह्या आणि ह्यांसारख्या छोट्या–मोठ्या प्रश्नांची उत्तरं या भागाच्या माध्यमातून आम्ही तुम्हाला देणार आहोत.

**पहिले कर्म – ब्राह्ममुहुर्तावर उठणे** म्हणजे पहाटे ध्यानधारणेसाठी उठणे – ह्याच वेळेला का बरे उठावे हाही एक प्रश्न आहे. कारण आजकाल आपण कुणाला विचारले की, तुम्ही किती वाजता उठता, तर कुणी ६, कुणी ७, कुणी ८ सांगेल. आपण म्हटलं की पहाटे लवकर उठले पाहिजे. तर लगेच का बरे? हा प्रश्न येणारच. तर तुम्हाला सांगते, आयुर्वेदानुसार ज्यांना आपण १०० वर्षे निरोगी जगावे असे वाटत असते, तसेच माझ्याकडून कळत–नकळत झालेल्या पापांचे क्षालन अथवा शांती व्हावी, शमन व्हावे – ब्रह्माकुमारी संस्थेत देखील ह्याच ब्राह्ममुहुर्ताला उठून ध्यानधारणा केली जाते. ह्या ध्यानधारणेमुळेच आपली शारीरिक, मानसिक तसेच आध्यात्मिक उन्नती होत असते. पहाटे साधारण ४ ते ४.४५ ही वेळ ब्राह्ममुहुर्तासाठी योग्य मानली जाते. आता पुढला प्रश्न म्हणजे ब्राह्ममुहुर्तावर कुणी उठावे. आयुर्वेद असे सांगते – की ज्या व्यक्तिंचे रात्रीचे जेवण पचून, जिरलेले आहे आणि रात्री १०च्या आत झोपते. तीच व्यक्ती बाह्ममुहुर्तावर उठू शकते. हे मी सांगतेय कारण जी व्यक्ती रात्री उशिरा जेवलेली असते, त्या व्यक्तीचं ब्राह्म मुहुर्तापर्यंत जेवण जिरलेलेच नसते. रात्री आपण झोपतो अशासाठी की शरीराला दिवसभराच्या थकण्यापासून आराम मिळावा, रात्रीचे दिवसाचे खाल्लेले अन्न पचन व्हावे. आणि ते तसे झाले तरच ब्राह्म मुहुर्ताचे फायदे आपल्याला मिळतात. याचाच अर्थ एखाद्याला ब्राह्ममुहुर्ताचे फायदे हवे असल्यास त्याने रात्री लवकर जेवून बिछान्यात शिरणे अत्यंत आवश्यक आहे.

महर्षि पतंजलीच्या योगशास्त्रात ही ब्राह्म मुहुर्ताचे वर्णन आलेले आहे. ते सांगतात की इडा आणि पिंगळा ह्या दोन्ही नाड्या आपल्या आज्ञा – चक्रावरती अमृतस्राव करत असतात. त्यामुळे आपल्या शरीरातील हार्मोन्स योग्य प्रमाणात (बॅलन्स) राहतात. ज्यांना ही वाटते की मी शारीरिक, मानसिक, आध्यात्मिक स्तरावर स्वस्थ राहावे. – त्या प्रत्येक व्यक्तीने रात्री लवकर जेवावे, लवकर निजावे आणि ब्राह्ममुहुर्ताच्या शुभ वेळेवर उठून ध्यान धारणा करावी.

आपण उषःपानाबद्दल (सकाळी पाणी, कुणी, कधी, किती प्यावे) नंतर कधीतरी जाणून घेऊया.



# “पहिल्याच भेटीत बाबांनी आपलेसे केले”

**(‘अनुभवगाथा’ ह्या पुस्तकातून घेतलेला अनुभव)**

**ब्र.कु. बसवराज, हुबळी, कर्नाटक**

मी विद्यार्थी दशेपासूनच परमेश्वराच्या शोधात होतो. ह्याचसाठी मी खूप गुरू केले, सेवा केली, व्रत-नियम अंगीकारले, परंतु कुठेच परमेश्वर प्राप्ती झाली नाही. मी शिवभक्त होतो म्हणून मी शिवाचा महिमा ऐकण्यासाठी प्रवचन, भजन, यात्रांमध्ये मोठ्या उत्साहाने मी होत असे.

एकदा काय झालं, मी वर्तमानपत्रात वाचले, ब्रह्माकुमारी संस्थेने एका कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. त्याचा विषय होता परमेश्वराला प्राप्त कसे करावे? मी विचार केला, अरे हा तर माझ्याच कामाचा विषय आहे, तर मग आपण नक्कीच जायला हवे!

ही बातमी मी रात्री ८ वाजता वर्तमानपत्रात वाचली परंतु इच्छित स्थळी पोहोचायला मला अंमळ उशीरच झाला होता - त्यामुळे त्यांचे प्रवचनही संपले होते. मग तिथे उपस्थित असलेल्या, परमेश्वरी कार्यासाठी निमित्त असलेल्या दादी हृदयपुष्पा ह्यांनी मला दुसऱ्या दिवशीच्या संध्याकाळी यायला सांगितले. दुसऱ्या दिवशी संध्याकाळी मी ठरलेल्या वेळी पोहोचलो. पण हे काय अरे देवा ! मला ते सर्वजण ख्रिश्चन मिशिनरीवाले वाटले. कारण हिंदू भगिनींप्रमाणे ह्या बहिणींनी गंध-टिकली काहीच लावलेले नव्हते. आणि त्यांची ती धारण केलेली पांढरी वस्त्रे ही ख्रिश्चन लोकांसारखे वाटत होते. तुम्ही आपल्या धर्माचा प्रचार करता का? तुम्हाला ह्या घराचे भाडे कुणाकडून मिळते? तुम्हाला कोण पोसते? (सांभाळ करते) या आणि ह्यांसारख्या प्रश्नांची सरबत्ती सुरू केली. दादी शांतपणे उत्तरल्या- अहो तुम्ही आधी ७ दिवस येऊन आमचे सर्व ज्ञान समजून घ्या. त्यानंतरच तुम्हाला सर्व काही समजून येईल, तुमच्या शंकांचे समाधानही त्यानंतरच करता येईल.’ मग मीही त्यांच्या ह्या उत्तराला होकार दर्शवला. त्यांचा मान ठेवत ७ दिवसांचा कोर्स (पाठ्यक्रम) पूर्ण केला आणि मग हळूहळू निश्चय पक्का होत गेला की, खरोखरच परमेश्वर ह्या पृथ्वीवर अवतरित झालेले आहेत. ह्या ईश्वरी विश्व-विद्यालयात साक्षात परमेश्वरच ज्ञान देत आहेत - हे सत्य बुद्धिने शेवटी स्वीकारलेच.

परमेश्वर परमपिता परमात्मा शिव, ब्रह्मा बाबांच्याच शरीरात का अवतरित झाले? ईश्वरी ज्ञानात जरी चांगला निश्चय झाला, तरी वरील प्रश्न मला फार-फार सतावत होता. कर्नाटकात मोठ्या संख्येने खूप महात्मा, त्यागी, मठाधीश, पीठेश्वर आहेत, पण ब्रह्मा बाबा तर वैष्णव होते. जगतगुरू तर ब्रह्मचारी असायला हवे. पण ब्रह्मा बाबा तर गृहस्थाश्रमी होते, गुरू लोक तर शैव असतात. ईश्वराचे भक्त असतात, ब्रह्मा बाबा तर व्यापारी होते. संन्यासी तर त्यागी, तपस्वी असतात. परंतु ब्रह्मा बाबा तर कुटुंब-परिवारवाले होते, आणि मी सुद्धा तर ब्रह्मचारी आहे, मग एका ब्रह्मचाऱ्यालाही सोडून ईश्वर ह्याच आत्म्याच्या (ब्रह्माबाबांच्या) शरीरात का बरं प्रवेश करतो ?

हा अति मोठा प्रश्न आ वासून मला सारखा सारखा त्रास देत होता, आणि ह्याचे उत्तर मात्र कुठेच सापडत नव्हते. ब्रह्माकुमारी बहिणींनाही मी ह्यातलं काही विचारू शकत नव्हतो, ह्याचे कारण म्हणजे भीती - की ह्या बहिणी माझे प्रश्न ऐकून सेवाकेन्द्रावरचे माझे येणे बंद केले तर काय ! म्हणूनच मग मी ह्याची उत्तर शोधण्यासाठी माऊंट आबू येथे गेलो. मी कुमार असल्याने मला तेथे जाण्याची लवकर संधी मिळाली असे मला नंतर कळले.

**मुरलीद्वारे मिळाली सर्व प्रश्नांची खरी-खरी उत्तरे**

मी माऊंट आबू येथे रात्री खूप उशिरा पोचलो. त्यामुळे गेल्या-गेल्या बाबा काही समोरासमोर भेटले नाहीत. सकाळी मुरली क्लासमध्ये बसून मुरली (ईश्वरी महावाक्य) ऐकली. मी ती दिनांक (तिथी-तारीख) वार माझ्या वहीत टिपून ठेवली आहे. कारण मला

जे गहन, किचकट प्रश्न पडले होते, त्या सर्व प्रश्नांची उत्तरे, त्या दिवशीच्या मुरलीतच मला मिळाली. मला खूपच आश्चर्य वाटले, की कमालच आहे, माझ्या सर्व प्रश्नांची उत्तरे एकाच मुरलीत? वा ! किती छान ! मी जरा सुखावलो आणि तात्काळ सगळा संशय निवळला. त्या दिवशी मुरलीत असे आले, की - हे ज्ञान प्रवृत्ती मार्ग आचरणाऱ्यांसाठीच असल्याने शिवबाबांना गृहस्थाश्रमी आणि त्यातूनही वृद्ध शरीराचा आधार घ्यावा लागतो. मग हे ऐकले, की लगेच माझ्या मनात दूसरा प्रश्न आला, (म्हणतात ना मन आणि लहान मूल ह्यांचे प्रश्न काही संपत नाहीत, एक संपला की दुसरा, तिसरा - चालूच) कुटुंब कबिलावाल्याच्या शरीराचा आधार का बरे घेतलास ईश्वरा? त्यानंतर मुरलीत पुढे आले, की हाच आत्मा (ब्रह्मा बाबा) नारायण बनणार आहे. परमेश्वर कुणा मनुष्यात्म्याला विचारून कुणाच्या शरीराचा आधार घेईल का? जर शिवबाबा कुणा संन्याशाच्या शरीरात अवतरित झाले असते, तर तात्काळ ते ज्ञान धारण करणारे सुद्धा हवेत ना ! जंगलात त्यांचे हे ज्ञान कोण ऐकणार, धारण करणार? मुरली ऐकून विचार चालला, की काही जास्त खोलात न विचारताही प्रत्येक प्रश्नाचं अगदी नेमकं उत्तर अगदी मोजक्या शब्दांत देणं - हे काम परमेश्वराशिवाय कुणीही येरा गबाळा करू शकणार नाही. आईसुद्धा असेच करते. आपल्या मुलाच्या प्रत्येक लहान मोठ्या प्रश्नाची उत्तरं तिला न विचारताही माहीत असतात. आणि ती ते देतेच. आणि बाळाच्या सर्व शंका मिटतात. परंतु ह्यात बघितले, तर असे दिसते की असे करणे तिला केवळ स्वत:च्या पोटच्या मुलासाठीच जमते, सर्वांसाठी तिला हे करता येत नाही.

**बाबांनी विचारले, मुला काय हवंय तुला?**

बाबांच्या खोलीत बाबांशी जेव्हा समोरासमोर भेट झाली, तेव्हा माझ्या मनातील इतर काही प्रश्न आणि मनातील गोंधळ त्यांच्यासमोर विषद केला. माझे हे प्रश्न ऐकून शिवबाबांचा रथ म्हणजेच ब्रह्माबाबा अगदी मन-मोकळेपणाने हसले. ब्रह्मा बाबा म्हणाले, बोल मुला, काय हवंय तुला? त्यावेळी मी हिन्दी आणि इंग्रजी भाषा मिळून ज्याला हिंगलीश म्हणतात, तसे बोलायचो. (हिन्दी धड यायचे नाही, त्यामुळे मग इंग्रजीचा आधार - दुसरं काय !) मला हिन्दी जास्त कळायचेही नाही - भाषा न समजणं ही सुद्धा एक मोठीच अडचण आहे. तरीही बाबांना तशाच तोडक्या-मोडक्या भाषेत म्हणालो, 'जी काही आंतरिक इच्छा होती, ते सर्व काही मला गवसलं बाबा आता आणि काय मागू, सर्व काही मिळाले.''

अशा प्रकारे पहिल्याच भेटीत बाबांनी मला आपलेसे केले. मग त्या दिवसानंतर घरी परतल्यावर मी भक्तीच्या संबंधित अनेक प्रश्न बाबांना पत्रातून लिहायचो आणि काय आश्चर्य! बाबाही त्या सर्व प्रश्नांची उत्तरं मला खूप प्रेमाने आठवडाभरातच लिहीत. ज्ञान आणि योग ह्यात निश्चय तर होताच, परंतु ब्रह्मा बाबांच्या जीवनशैलीने मला खूप भारावून टाकले. करोडपती असूनही बाबांचे ते सर्व काही क्षणात त्यागण्याची वृत्ती, ईश्वराप्रति अति प्रेम - त्यामुळे तपस्वी बनणे, ईश्वराप्रति त्यांची (लगन) तळमळ., सर्व नातेवाईक, सर्व गुरू सामाजिक प्रतिष्ठेचा त्याग - ह्या आणि ह्यांसारख्या अनेक गोष्टी खूप प्रेरणा देऊन गेल्या. मी विचार करू लागलो, की कुमार असूनही मी असा का बरं बनू शकलो नाही?

**त्याग-तपस्येचे उदाहरण उभारण्याची तळमळ लागली**

'एक बाबा, दुसरे कुणीच नको' बाबांची ही शिकवण मला तर फारच आवडली. बस, बाबाच माझं जीवन आहेत आता. ब्रह्मा बाबांचा त्याग आणि तपस्या बघून माझेही चिंतन चालायचे की कुमार असूनही जर त्याग-तपस्येचे कुठले उदाहरण जर मी उभारु शकलो, नाही, तर परमात्म्याप्रति माझी तळमळ काय कामाची? जे काम एखादा कुटुंब चालवणारा गृहस्थी जर करू शकत असेल, तर मग मी तर एक कुमार आहे. (मला तर कोणता आगा न पिछा !) मी का नाही हे करू शकणार?

माझे शिक्षण पूर्ण झाल्यावर एनवायरमेन्टल सायंटिस्ट म्हणून मला छान नोकरी मिळाली. पगारही चांगला होता. मला हवी होती, तीच माझ्या स्वप्नातली नोकरी असल्याने मीही लगेच स्वीकारली. बाबांनी मला हेच सुचविले होते. मी ब्रह्माबाबांसारखा करोडपती तर नव्हतो. पण त्यामुळेच माझा सर्वच्या सर्व पगार ह्या राजस्व अश्वमेध यज्ञात सफल करून शिवबाबांच्या मुलांच्या यादीत सर्वप्रथम यावे म्हणून मी खूप प्रयत्न केले. हे ही पक्के मनाशी खूणगाठ बांधून ठरविले, शरीराच्या अस्थि यज्ञात समर्पित करणे फक्त दधिची ऋषिंचेच वर्णन नसून माझेही आहे. मी ते करणारच. ह्याच सेवेचा एक भाग म्हणून ईश्वराच्या नावावर जास्तीत जास्त जमीन सरकारकडून खरेदी केली. येल्लापूरमध्ये

(पृष्ठ क्र.१५ वर)

शौर्य गाथा

# शौर्याचे किंवा धाडसाचे अनेक प्रकार...

ब्र.कु. नरेश, मुजफ्फरनगर

(शौर्याची विविध रूपे आहेत. आपण आता त्यातील काही रूपे पाहूया...)

**शारीरिक शौर्य :**

शारीरिक शौर्य, सर्वसंकटांना तुच्छ समजून समोरून होणाऱ्या आक्रमणाशी सामना करणे मग ते आक्रमण कुणा शत्रूच्या सैन्याकडून असो, दहशतवाद्याकडून असो, कोणी भक्षक प्राणी असो, किंवा उन्मादी शत्रूकडून असो.

याचे जिवंत उदाहरण म्हणजे गढवाल रायफल्सचे सैनिक जसवंत सिंग रावत. १७ नोव्हेंबर १९६२ रोजी चीनबरोबरच्या नुरा रंगच्या युद्धात त्यांनी एकट्याने आघाडी सांभाळून, शत्रूला कळूही दिलं नाही की ते आपल्या चौकीवर एकटेच आहेत. त्यांनी वेगवेगळ्या बंकरवर पाच मशीनगन पुढच्या भागावर बसवल्या आणि पाचही मशीनगनमधून आळी-पाळीने धावत जात ७२ तास गोळीबार करत राहिले. त्यांनी ३०० चिनी सैनिकांना यमसदनास धाडले. शेवटी तो एकटाच असल्याचे उघड झाले आणि त्यांना चिनी सैनिकांनी मारले. त्यांना मरणोत्तर महावीरचक्र प्रदान करण्यात आले. त्यांच्या धाडसामुळे अरुणाचल प्रदेश चीनच्या ताब्यात जाण्यापासून वाचला. जिवंत सैनिकाला मिळणाऱ्या सर्व सुविधा भारतीय लष्कर त्यांना मरणोत्तर देत आहे. इतकेच नाही तर त्यांना नायक ते कॅप्टन, मेजर वगैरे पदांवर बढती देण्यात आली होती आणि त्यानुसार त्यांच्या कुटुंबियांना सुविधा देण्यात आल्या.

**नैतिक धाडस :**

हे शौर्य, व्यक्तीला सत्य-स्वरूप बनवते. नैतिकदृष्ट्या धैर्यवान ! असा माणूस कितीही नुकसान सहन करावे लागले तरी सत्य बोलतो आणि आयुष्यभर सत्याची कास धरतो. महान होण्यासाठी शारीरिक शौर्य आणि नैतिक शौर्य दोन्ही आवश्यक आहेत.

उदाहरणार्थ, वाराणसीचे तत्कालीन एक अधिकारी डी. एस. पी शैलेंद्र सिंह, यांनी २००४ मध्ये एक कुख्यात माफिया डॉनविरुद्ध एफ.आय.आर.ची नोंद केली आणि POTA (दहशतवाद प्रतिबंधक कायदा) देखील लागू केला. मुख्यमंत्री आणि अनेक गुन्हेगारांचा दबाव असतानाही त्यांनी ना अहवाल मागे घेतला ना तो सौम्य केला. ते शौर्याने सत्याला चिकटून राहिले . खूपच दबाव आला तेव्हा त्यांनी राजीनामा दिला. त्यानंतर त्यांना जिथे कुठे नोकरी मिळायची तिथे त्यांच्या मालकांवर विरोधक दबाव आणायचे व ह्यांना कामावरून काढून टाकायचे. त्यांची पत्नी नोकरीतून घरखर्च भागवत असे आणि अन्यायाविरुद्ध लढण्यासाठी पतीला कायम मानसिक बळ देत असे. मनाच्या पावित्र्यातूनच नैतिक धाडस निर्माण होऊ शकते.

**साहित्यिक धाडस :**

धाडस असणे गरजेचे, मग जीवन खऱ्या अर्थाने कुठूनही सुरू होऊ शकते. याचे उदाहरण आहे, प्रसिद्ध शास्त्रज्ञ आयझॅक न्यूटन. एकदा त्यांचे शोधनिबंध टेबलवर ठेवले होते. ते थोड्या वेळासाठी चर्चमध्ये गेले. तेवढ्यात एका मांजरीकडून टेबलवरची मेणबत्ती पडली आणि सर्व कागद जळून गेले. अनेक वर्षांची मेहनत वाया गेली पण त्यांनी संयमाने, धाडसाने सर्व कागद पुन्हा तयार केले कारण त्यांचा स्वतःच्या स्मरणशक्तीवर गाढ विश्वास होता.

**आर्थिक शौर्य :**

शिवपित्याने स्थापन केलेल्या ज्ञानयज्ञात जेव्हा आर्थिक चणचण निर्माण झाली तेव्हा अनेक यज्ञ-वत्स घाबरले आणि पळून गेले. त्यावेळी ब्रह्माबाबांनी आर्थिक धाडस दाखवून सर्व काही शिवबाबांवर सोडून दिले. जर ब्रह्माबाबांनी हे आर्थिक धैर्य दाखवले नसते, तर यज्ञाचा इतिहास काहीतरी वेगळाच झाला असता. एके काळी नवकोट नारायण असणाऱ्या ब्रह्माबाबांना अशा परीक्षा देताना जराही साशंकता स्पर्श करू शकली नाही.

**अस्तित्व हित शौर्य :**

इस्त्राइल हा एक छोटासा देश आहे त्याचे क्षेत्रफळ हरयाणा राज्याच्या निम्मे आहे आणि लोकसंख्या मात्र ९० लाख आहे. परंतु हा देश एकट्याने शत्रू राष्ट्रांचा नाश करतो कारण या देशाचा प्रत्येक नागरिक राष्ट्रासाठी समर्पित असतो आणि जेव्हा युद्ध सुरू होते तेव्हा ते लढण्यास प्रत्येक प्रौढ नागरिक पात्र असतो. ज्याच्यात देशप्रेम आहे, त्याच्यात देशासाठी बलिदान देण्याचे धैर्यही आहे. इस्त्रायलचे नागरिक, 'लढा किंवा मरा' या तत्त्वावर ठाम आहेत.

**धार्मिक शौर्य :**

महाराष्ट्रातील एका गावात एक लहान मुलगी खेळत होती. अचानक यवन आले आणि गावातील मंदिर तोडण्यास सुरुवात केली. तिने प्रतिकार केल्यावर सैनिकांनी तिला धक्के मारून पळवून लावले. मुलीच्या आई-वडिलांनी पटकन जाऊन मुलीला आणले व घरात कोंडून घेतले.

ती मुलगी खिडकीतून मंदिर तोडताना पाहत राहिली आणि अश्रू ढाळत यवनांसमोर गर्जत राहिली, 'मी तुम्हाला या पापाचा दंड दिल्याशिवाय राहणार नाही.'

पुढे मुलगी मोठी झाली व तिचे लग्न झाले. त्यानंतर ती रोज आपली इष्ट देवता 'भवानीमाते' कडे प्रार्थना करत असे, माझी इच्छा पूर्ण करणारा धर्मरक्षक पुत्र माझ्या पोटी जन्माला घालावा. तिच्या दृढनिर्धाराने जन्माला आलेला मुलगा म्हणजे आपले शिवाजी राजे आणि ती मुलगी म्हणजे त्यांची आई जिजाबाई.

**न्याय शौर्य :**

इंदूरजवळील महेश्वर राज्याचे राजे खंडेराव होळकर पानिपतच्या तिसऱ्या युद्धात मरण पावले. त्यानंतर त्यांच्या पत्नी अहिल्याबाई होळकर राणी झाल्या. त्यांना एकच पुत्र होता. त्याचा राज्याभिषेक होणार होता. एके दिवशी राणीच्या दरबारात तक्रार पोहोचली की तुमच्या मुलाने एका स्त्रीशी लैंगिक संबंध ठेवण्याचे पाप केले आहे. अशा गुन्ह्याची शिक्षा म्हणजे हत्तीच्या पायाखाली चिरडून मृत्यूदंड दिला जात असे. अहिल्याबाईंनी या आरोपाची चौकशी केली असता आरोप खरा असल्याचे आढळून आले. तेव्हा राणीने सैनिकांना सांगितले की, माझ्या मुलाला घेऊन या आणि त्याला हत्तीच्या पायाखाली द्या. हे ऐकल्यावर, असे होऊ नये म्हणून सर्व मंत्रीगण व प्रजा रडू लागले. पण राणीने न्यायालयीन धैर्य दाखवून, जी शिक्षा प्रजेसाठी आहे तीच माझ्या मुलासाठी आहे असे सांगितले.

जेव्हा त्यांचा मुलगा मरण पावला. तेव्हा अहिल्याबाईंनी राणीचा पोशाख काढला आणि पांढरी साडी नेसून शोक केला. त्यानंतर त्यांनी नर्मदा नदीच्या तीरावर स्वत:च्या हातांनी मुलावर अंत्यसंस्कार केले.

**राष्ट्रहित शौर्य :**

देशाचे हित लक्षात घेऊन उच्च अधिकाऱ्याची आज्ञा पाळण्यास नकार दिला तर ते राष्ट्रहित धैर्य होय. सॅम माणेक शॉ, भारतीय लष्कराचे माजी फील्ड मार्शल, हे त्याचे उदाहरण आहे. बांगलादेशातील स्वातंत्र्यलढा २६ मार्च १९७१ ते १६ डिसेंबर १९७१ पर्यंत चालला. जीव वाचवून बांगलादेशी नागरिकांनी भारतात आश्रय घेण्यास सुरुवात केली. तेव्हा तत्कालीन पंतप्रधानांनी १३ एप्रिल १९७१ रोजी मंत्रिमंडळाची बैठक बोलावून फील्ड मार्शलला पूर्व पाकिस्तानातील रक्तपात थांबवण्यासाठी पाकिस्तानी सैन्यावर हल्ला करण्यास सांगितले. माणेक शॉ म्हणाले की, 'कापणीचा हंगाम सुरू असल्याने आणि रेल्वे वॅगन्स धान्य वाहून नेण्यात व्यग्र असल्याने असे करण्याची ही योग्य वेळ नाही. त्यामुळे लष्करची वाहतूक शक्य होणार नाही. त्यात भर म्हणून पावसाळा सुरू होणार आहे. पावसाळ्यात बांगलादेशातील नद्यांना पूर येतो. त्यामुळे तेथे लष्कराची हालचाल शक्य होणार नाही. मात्र पंतप्रधानांना लष्करप्रमुखांचे हे वक्तव्य अपमानास्पद वाटले आणि मी जे सांगते त्याचेच तुम्ही पालन करावे असे म्हटले.'

त्यावर माणेक शॉ म्हणाले, 'तुम्ही लष्कराच्या कारभारात ढवळाढवळ करू नये आणि लढण्यास प्रतिकूल परिस्थिती असताना मला लढायला भाग पाडू नका. अशा वेळी आपली हार निश्चित आहे. त्यानंतरही पंतप्रधानांनी ते मान्य केले नाही', तेव्हा माणेक शॉ म्हणाले की, 'आता तुम्ही मला बडतर्फ करा किंवा मी राजीनामा देतो.' त्याक्षणी पंतप्रधानांनी बैठक संपवली आणि सर्व मंत्री बाहेर गेले. सरतेशेवटी पंतप्रधान आणि लष्करप्रमुख निघून जाऊ लागले तेव्हा पंतप्रधानांनी नाईलाजास्तव लष्करप्रमुखांची सूचना मान्य केली. राष्ट्रहितासाठी वरिष्ठ अधिकाऱ्याशी बोलण्याचे धाडस काय असते, हे या घटनेवरून दिसून येते.

**जन्मजात नेतृत्व गुण शौर्य :**

एकदा एक सैनिक स्वरण सिंग, लष्करप्रमुख माणेक शॉ यांच्यावर एका गोष्टीवरून रागावला. त्याने आपल्या

(पृष्ठ क्र.१५ वर)



# देव सन्निध आहे

ब्र.कु. सुनिता, शिवमणी होम, आबू रोड

ही गोष्ट ३० सप्टेंबर २०२१ ची आहे. ज्ञान सरोवर मध्ये स्पार्क विंग तर्फे १ ते ५ ऑगस्ट पर्यंत असलेल्या (विशेष योगसाधना) भट्टीसाठी निमंत्रण होते. म्हणून मी ट्रेनचे आरक्षण केले. जायची सर्व पण तयारी झाली. त्या दिवशी मला माझी C.A. सारखी-सारखी फोन करून इन्कम टॅक्स रिटर्नसाठी जे आवश्यक कागदपत्रे आहेत ते आणून द्या असे सांगत होती. तो फोन घेण्यात, त्यांची उत्तरे देण्यात उशीरच झाला. आणि घरीच ५.२० झाले. सामान घेऊन नाक्यावर गेले रिक्षा केली, तिथेच ५.३० वाजले. ट्रेनची वेळ होती ५.४०.

मी रिक्षावाल्याला सारखे-सारखे सांगत होते. लवकर चल, लवकर चल... तो भाऊ म्हणाला, मॅडम, तुम्हीच उशीर केलात. आणि आता मला घाई करताय! यावर मी काहीच बोलले नाही. कोणत्या तोंडाने बोलू ? मनात फक्त बाबांचा धावा सुरू होता - 'बाबा काही करा, पण मला ही गाडी मिळू द्या. रिक्षा स्टेशनच्च्या बाहेर आली आणि गाडीची शिट्टी वाजली. मी रिक्षावाल्या भावाला म्हटले, 'माझे सामान आत घेऊन ये येशील का? म्हणजे मला पळत-पळत आत येता येईल. गाडी पकडता येईल 'पण तो चक्क नाही म्हणाला - 'अहो ताई प्लॅटफॉर्म तिकिट वगैरे घ्यावे लागेल, मी नाही आत येऊ शकत.' मी त्याला भाडे दिले, आणि सामान घेऊन पळत सुटले. आजूबाजूला बसलेले लोक म्हणाले, 'पळा लवकर ताई, गाडी सुटली बघा'. खरंच फलाटावर एकदम शांतता पसरली होती आणि ट्रेन हळूहळू पुढे सरकत होती. तिथे फक्त एक स्त्री पोलीस आणि एक जवान दोघेच उभे होते. त्यांनी विचारले, 'कुठे जायचे आहे?' मी त्या चालणाऱ्या ट्रेनकडे इशारा केला की ह्याच गाडीत जायचे होते. ते म्हणाले, 'आत्तापर्यंत कुठे होतात? लवकर यायचे ना थोडं!' मी काय बोलणार ! कारण त्यांचे म्हणणे रास्त होते. तरी मी त्यांना म्हटले की कुणीही सुटकेस जरी चढवली, तरी मी चढू शकेन' - पण ते नाही म्हणाले, ती स्त्री पोलीस म्हणाली, 'मॅडम ह्यात धोका आहे.'

आता मात्र माझे डोकेच चालेना. तेवढ्यात एक मोठा अधिकारी आला आणि म्हणाला, 'ताई तुम्ही गार्डच्या बाजूच्या डब्यात चढा, मी पुढे तसा फोन करतो. त्यांनी तसे म्हटलेले ऐकताच मी सूटकेस घेऊन पळायला लागले. केबिनमध्ये सूटकेस टाकली आणि मी ही कशीबशी चढले. त्या केबिनमध्ये कुणीच नव्हते. मी दरवाज्यात उभी राहून त्या अधिकाऱ्याला धन्यवाद म्हणावे म्हणून डोके बाहेर काढले, पण तिथे फक्त ते दोन पोलीस (स्त्री पोलीस आणि जवान) दोघेच दिसले. पण, ज्यांनी फोन करून गाडीची गती संथ केली होती. ते अधिकारी मात्र दिसेनात. बस, माझ्या मनात आले की बाबांनीच हे सर्व केले. मग काय इतके आनंदाश्रू आले की सांगू शकत नाही मी ! त्या केबिनमध्ये फक्त मी आणि माझे बाबा होतो ! इकडे माझे आनंदाश्रू ओघळत होते, तिकडे गाडी जोरात धावत होती.

अशा प्रकारे बाबांनी स्वत: येऊन आपल्या मुलीची मदत केली. पुढे उज्जैन आले. मीही माझ्या डब्यात सीट पाशी पोहोचले आणि दुसऱ्या दिवशी आपल्या बाबांबरोबर, बाबांच्या घरी पोहोचले. ही आहे बाबांची कमाल - असंभव सुद्धा संभव करून दाखवले माझ्या बाबांनी ! शुक्रिया बाबा !

***

- चांगली पुस्तके एका जादूच्या चटईसमान असतात. ती आपल्याला हळूहळू अशा जगाचा प्रवास करवतात. जिथे आपण दुसऱ्या कुठल्याच माध्यमाद्वारे पोहचू शकत नाही.
- उच्च (श्रेष्ठ) आणि स्वच्छ स्पर्धा आरोग्यपूर्ण आयुष्याचे चिन्ह आहे, पण असुया, द्वेष मात्र भयंकर आजार



# अंतर्मनाची अद्भुत शक्ती

ब्र.कु. सूरज, आबू पर्वत

तुम्हाला जर एखाद्याची तुमच्याबद्दल असलेली मते, बदलायची असतील, कुणाचे वाईट संस्कार बदलायचे असतील, कुणाची दारू सारखी व्यसने सोडवायची असतील तर, कुणाला आपला मित्र बनवायचा असेल, तर तसेच बंद पडलेली कामे सुरळीत करायची असतील तर विचार करा आपण तसे करू शकू का? तर ह्याचे उत्तर नक्कीच 'हो' असे असेल.

कुणावर कर्जाचा डोंगर असेल, कुणाचा पगार यायचा बाकी असेल, कुणाचे भाडे थकले असेल, पैशांची चणचण ह्या आणि ह्यासारख्या अनेक विघ्न समस्यांचे निवारण काय असू शकेल, ते आता आपण बघूया.

ह्यासाठी सकाळी उठताच परमेश्वराचे मनापासून धन्यवाद करा. हे आभार मानणं खूप मोठी गोष्ट आहे. ज्यांनी आपल्याला इतकं काही दिलं, जसे तुमचे दोन डोळे ह्या द्वारे तुम्ही हे जग पाहू शकता, दोन हात, पाय, राहायला घर, प्यायला पाणी, खायला अन्न, नेसायला वस्त्र, निवारा सर्व सर्व अगदी छोट्या-मोठ्या गोष्टी ज्यांचा सध्या तुम्ही उपभोग घेत आहात त्याबद्दल त्याचे आभार व्यक्त करा. घरातील एक-एक वस्तु, सोफा, खुर्ची, टेबल, तुम्ही खात असलेल्या सात्विक अन्नाबद्दल-अन्नदात्याचे मनःपूर्वक आभार माना. सकाळी उठताच पहिला संकल्प - मी परमेश्वराची संतान आहे, त्यांनी माझ्या भाग्याचे द्वार उघडलेले आहे. त्यामुळेच मी खूप-खूप भाग्यवान आहे. मी खूप-खूप श्रीमंत आहे. माझ्याकडे खूप पैसा, संपत्ती, घर-दार सर्व काही कशाचीच कमतरता नाही, मी कर्जमुक्त आहे - भरपूरता, संपन्नता माझ्या जीवनात आलेली आहे. संकल्प कमीत कमी ७ वेळा करा.

तुमचे घेतलेले पैसे कुणी देत नसेल तर, सैलसर कपडे घालून शांत होऊन खुर्चीत बसा. डोळे मिटून स्पष्टपणे बघा ..ती व्यक्ती तुमच्यासमोर आलेली आहे आणि तुमचे पैसे तुम्हाला परत करत आहे. चेक देत आहे असे साधारण २१ दिवस एकाच ठिकाणी बसून एका निश्चित वेळेला करा आणि त्या व्यक्तीचे सुद्धा खूप खूप आभार माना की धन्यवाद तुमचे, तुम्ही माझे पैसे परत केलेत, तुम्हालाही खूप पैसे मिळो, तुम्हीही श्रीमंत व्हा...

कुणाचे संस्कार बदलायचे असतील तर सर्वात आधी त्याला आत्मिक स्वरुपात बघा. तो भले तुमच्या जवळ असेल की तुमच्यापासून लांब. त्यानंतर सर्वशक्तीवान परमेश्वराकडून सर्वशक्तीचे किरण घेऊन त्या आत्म्याला ते किरण द्या. ५ ते १० मिनिटे तुम्ही जास्त वेळही हे करू शकता. जेवढा जास्त वेळ कराल, तुमचाच फायदा आहे. काम लवकर होईल. सकारात्मक विचारांचे किरण दिले की, त्याच्याशी मानसिक संवाद साधा - तू माझा खूप चांगला मित्र आहेस. आपल्यात खूप स्नेह आहे. 'आपण नेहमीच जीवनात बरोबर राहून हा प्रवास, प्रेमाने, सन्मानाने पूर्ण करू, जीवनातील आनंद एकमेकांबरोबर वाटून सुखी राहूया - असे संवाद साधा त्या व्यक्तीशी - अगदी समोरासमोर बोलल्यासारखे मानसिक संभाषण करावे.

कुणी हृदय विकाराने ग्रस्त असेल, दारूच्या आहारी गेलेला असेल, कॅन्सरग्रस्त रोगी असेल, किडनी खराब झाल्या असतील, - ह्या समस्यांमध्ये त्या व्यक्तीला संकल्प द्या. तू खूप चांगली व्यक्ती आहेस, खूप चांगली, प्रभावी व्यक्ती आहेस. तू देवात्मा आहेस, खूप महान आहेस, खूप शक्तिशाली आहेस त्यामुळे दारू सोडण्यासाठीचे बळ तुझ्यात नक्कीच आहे. तू देव कुळातील पवित्र आत्मा असल्याने हे खराब - वाईट संस्कार तुझे नक्कीच नाहीत. हे दारू पिणे खूप हानीकारक आहे. हे तुझ्याबरोबरच इतरांनाही त्रास देत आहे. (आता

त्याला आज्ञा द्या) म्हणून तू ही वाईट सवय सोडून दे - हे सुद्धा २१ दिवस करा - अखंड.

कुणी व्यक्ती तुम्हाला खूप वाईट बोलत असेल, दुखवत असेल - त्रास देत असेल - तर त्याच्याशी (त्या व्यक्तीशी) सुद्धा असेच संभाषण, गैरसमज दूर करा- अगदी रोज - म्हणजे जसे वर सांगितले आहे. २१ दिवस तरी कमीत कमी-संकल्प - तू खूप चांगला. बुद्धिमान आत्मा आहेस. तू सर्वांना सुख देतोय. तूही परमेश्वराचे मूल आहेस. म्हणूनच आतापासून तू सर्वांना सुख देत जा - तू आपल्या सुंदर मधुर बोलण्याने सर्वांना सुख देत जा - कारण आपण जे देतो तेच आपल्याला परत मिळते म्हणून तू सुख देत जा, सुख घेत जा ... अशी शेवटी त्याला आज्ञा करा.

हे काम तुम्हाला सकाळीच करावे लागेल, म्हणजे ज्यावेळी ती व्यक्ती झोपलेली असेल, तेव्हा हे संकल्प त्याला द्या. (सकाळी ४-५-६ ह्या वेळी करावे)

ह्यासाठी आज्ञा किंवा संकल्प देणारी व्यक्ती देखील खूप खूप सकारात्मक असावी. माझे संकल्प त्या व्यक्तीला पोहोचतीलच दृढ निश्चय देखिल असावा. तसेच ही व्यक्ती नक्की बदलेलच असाही विश्वास वाटावा. हा विश्वासच काम करतो.

अशा प्रकारे वरील विधीने तुम्ही एखाद्याचे विचार, संस्कार भावना प्रकंपने, सर्व काही बदलू शकता.

***

---

(पृष्ठ क्र.१० वरून)

दहा एकर जमीन खरेदी करून तिथे बाबांचे सर्वात प्रथम तपस्याधाम बांधले. तिथेच सर्वांत पहिले (जगातील) मूल्य शिक्षण सेवाकेन्द्र बनले. तिथूनच आज पावेतो अखंड सेवा चालू आहे.

एकदा धार्मिक सम्मेलनाच्या निमित्ताने एका जगत् गुरुंबरोबर माझे अमेरिकेला जाणे झाले. न्यूयॉर्क, बोस्टन, मॅरीलँड सारख्या शहरांत बाबांचा झेंडा फडकविला. बाबांनी सर्वात आधी मलाच निमित्त केले - विश्व - नव-निर्माण पत्रिका काढण्याकरिता. अजूनही बाबा माझ्याद्वारे खूप-खूप सेवा करून घेतात. ह्याच क्रमात स्वर्गाचे दृष्य दाखविणारी एक मोठ्या मोठ्या फोटोंचे पुस्तकही बाबांनी करवून घेतले. तसेच स्पोर्टस् विंग (खेळाचा विभाग) चेही अध्यक्ष पद भूषवित अनेक वर्षांपासून मी सेवा देत आहे. ह्यात मी स्वत:बरोबरच इतरांचा ही सहभाग करून सेवा करतो - करवतो.

हा माझा दृढ निश्चय आहे की, बाबांनी जे म्हटलंय, ते करायचेच काहीही झाले तरी. ह्यात एक सांगू इच्छितो की, बाबांनी मुरलीत जे सांगितले आहे, ते जर १००% आचरणात आणले, तर आपणही आपले भाग्यविधाता सहज बनू शकू.

'एक बाबा, दूसरे कुणीच नको' ही धुन जर लागली, तर कल्पांतरीची कमाई जमा होईलच. परंतु 'आता नाही तर कधीच नाही' हेही जरूर आठवणीत ठेवा.

***

---

(पृष्ठ क्र. १२ वरून)

साथीदारांना सांगितले की आज मी माणेक शॉना गोळी घालीन. प्रकरण लष्कराच्या उच्च अधिकाऱ्यांपर्यंत पोहोचले तेव्हा त्यांनी स्वरण सिंग यांच्याकडून पिस्तूल आणि मशीनगन काढून घेण्यात आली आणि त्याला ताब्यात घेऊन एका खोलीत बंद केले. ही बाब माणेक शॉ यांना समजताच त्यांनी संबंधित अधिकाऱ्याला सांगितले स्वरण सिंगला हजर करा. त्याला आणल्यावर माणेक शॉने आधी त्याची शस्त्रे परत दिली आणि नंतर कठोरपणे विचारले, 'स्वर्णसिंग, तू मला गोळ्या घालशील का?'.

स्वर्णसिंग हात जोडून म्हणाला की साहेब, माझ्याकडून चूक झाली. मला माफ करा. माणेक शॉने त्याला सांगितले की 'आता तुझी ड्युटी माझ्या निवासस्थानी असेल. पहाटे ५ वाजता तुम्ही मला चहा आणि दाढी करायला एक मग गरम पाणी द्या.' माणेक शॉ यांनी नंतर कबूल केले की ते स्वरण सिंग यांना घाबरत होते, परंतु लष्करप्रमुखांची भीती लष्करी अधिकारी आणि सैनिकांना दिसली असती तर त्यांचे मनोधैर्य कमी झाले असते. धाडस म्हणजेच आपल्या भीतीचा सामना करणे. शौर्य म्हणजे मी जरी पडलो तरी लगेच उठून पुन्हा परिस्थितीशी सामना करीन.

वरील सर्व उदाहरणे पाहता सामान्य माणसाला रणांगणात काही पराक्रम करायला जायचे नाहीय; पण जीवनात येणाऱ्या प्रसंगांना तोंड देताना डगमगायचे नाही एवढीच शिकवण गाठीशी असणे महत्त्वाचे आहे. जीवनात नैतिकतेचे बळ मिळवायचे असेल तर आपण स्वतः शरीर नसून आत्मा आहोत याचा गहन अभ्यास किंवा हीच साधना करत राहिले तर सर्व प्रसंगांना तोंड देणे सुकर होईल.

**अनुवादक: ब्र.कु. पूजा, ठाणे**

***



# सत्य घटना
# जेव्हा गावात पाण्याचा खडखडाट होता

**ब्र.कु. सोमैय्या, सिंकदराबाद, तेलंगणा**

**आजचा अनुभव आहे सिकंदराबाद, तेलंगणा राज्य येथील रहिवासी ब्र.कु. सोमैय्या भाईंचा. आम्हांला नक्कीच हा विश्वास वाटतो की, सोमैय्या भाईंना आलेला हा सत्य अनुभव तुम्हालाही शिवबाबांबद्दल वाटणारा विश्वास आणि प्रेम अजून वृद्धिंगत करेल. जर तुमचेही शिवबाबांबद्दलचे असेच चमत्कारी – अनुभव असतील, तर आपणही आपला अनुभव थोडक्या शब्दांत अमृतकुंभसाठी लिहून पाठवू शकता. आम्ही तो नक्कीच प्रकाशित करू. – संपादक**

सोमैय्या भाई स्वानुभव सांगताना म्हणतात. 'मी घरी गीता पाठशाळा चालवतो. ह्या ईश्वरी कार्यात माझ्या पत्नी आणि मुलांचा विशेष सहभाग आहे.

ही गोष्ट २०१४ सालाची आहे. आमच्या गावात पाण्याचा फारच तुटवडा निर्माण झाला होता. त्यामुळे शेतीचा व्यवसाय करणाऱ्या शेतकरी लोकांच्या मनात दिवसेंदिवस फारच भय, आणि चिंता वाढत जात होती. त्यामुळे गावातील बऱ्याच भाऊ-बहिणींनी पाण्याच्या ह्या प्रश्नावर तोडगा निघावा यासाठी गावातील हनुमान (मारुती) मंदिरात (देऊळ) भजन-कीर्तनाचा एक कार्यक्रम करायचा असे ठरविले. हा कार्यक्रम मोठ्या उत्साहात लागोपाठ २१ दिवस साजरा करण्यात आला. एवढे सगळे करूनही पावसाने काही आगमन झालेच नाही. ह्यामुळे मग शेतकऱ्यांच्या दु:खात जास्तच भर पडली.

आमच्या गावाच्या बाहेर एक जुने शिवाचे मंदिर आहे. ह्याच मंदिरात गेली अनेक वर्षे मी आणि आपला एक भाऊ दर सोमवारी जाऊन शिवपरमात्म्याचा सत्य परिचय इतरांना देण्याची सेवा करतो. एक दिवस अमृतवेळेला उठल्यानंतर आणि बाबांना सुप्रभात (GM) म्हटल्यानंतर माझ्या तोंडून सहजच उद्‌गार निघाले, 'मीठे बाबा, प्यारे बाबा, अहो पाणी हवंय, गावातील तुमची सर्व मुले पाण्याच्या एका थेंबासाठी आसुसलेली आहेत. बाबा कृपा करून पाऊस येऊ द्या.' अशाप्रकारे मी शिवबाबांना आर्जवे करत राहिलो. त्यानंतर साधारण २ दिवसांनी सोमवारच्या दिवशी त्याच जुन्या शिवाच्या मंदिरात जाऊन पुन्हा एकदा बाबांच्या भक्तांना बाबांचा सत्य परिचय देण्याची सेवा केली. त्यानंतर परमात्म्याच्या आठवणीत तिथेच मंदिर परिसरात बसून राहिलो. मनातल्या मनात म्हटले उद्यापासून मी ही सेवा न करता, तुमच्या आठवणीतच रात्रं-दिवस बसून राहीन. काहीही झाले तरी पाणी (पाऊस) पडेपर्यंत ही प्रतिज्ञा तोडणार नाही.

मग गावातल्या सर्व लोकांना जमा करून सांगितले की उद्यापासून आपण सर्वजण मिळून एकत्रित (संगठीत योग आवाहन) योगतपस्या करूया. बाबांची खूप खूप आठवण करूया. हा अखंड योग असेल. माझा हा प्रस्ताव सर्वांना खूप आवडला. गावातील मातांनी तर खूप उत्साह दाखवत ह्याला होकार दर्शविला. तो सोमवारचा दिवस होता. असे ठरले की गावातील काही भाऊ मंगळवारी रात्रीच ह्या जुन्या शिव-मंदिरात-शामियाना, खुर्च्या, लाईट वगैरेंची व्यवस्था करतील जेणेकरून ही योग भट्टी रात्रं-दिवस चालू शकेल.

परमधामनिवासी करुणासागर शिवबाबांनी आपल्या मुलांचा हा उत्साह बघितला आणि अगदी मंगळवारी दुपारीच खूप मोठा पाऊस सुरू झाला. हा ईश्वरी चमत्कारच म्हणावा लागेल. कुणाचाच विश्वास बसत नव्हता. अरे लांब वर कुठेच काळे ढग दिसत नव्हते, पावसाची काहीच चिन्हं नव्हती, तरीही एवढा जोरदार पाऊस! गावातील लोकांच्या आनंदाला पारावार उरला नाही. सर्वांच्याच डोळ्यात आनंदाश्रू आणि

मनोमन त्या दयाळू शिव परमात्म्याला लाख लाख धन्यवाद देत आभार प्रदर्शन चालू होते.

मीही मनात म्हटले हे दया सिंधू शिवबाबा आमचे लाख धन्यवाद स्वीकारा माझ्या लाडक्या बाबा! बाबांवरील प्रेम अढळ आणि अतूट निश्चयामुळे अनेक गावकऱ्यांना शिवबाबांच्या छत्रछायेखाली आणले. इथे मी एक सांगू इच्छितो की जर तुमचा परमेश्वरावर अढळ विश्वास असेल, तर हे नक्की की कुठल्याही महा कठीण परिस्थितीत जर तुम्ही श्रद्धा आणि विश्वासपूर्वक डोळे बंद करून परमेश्वराला साद घातलीत - माझ्या मित्रा, दयाघना सोबती या हो या मदत करा... मग बघा कशाप्रकारे विपरीत परिस्थिती सुद्धा कशी 'सुली से काटा क्षणात बदलते ते'. हा अनुभव करण्यासाठी परमेश्वरावर आणि स्वतःवरही खूप विश्वास हवा.

आता जरा विचार करा हे – 'असं समजा की तुमचे स्वतःचे मूल कुठल्यातरी संकटात आहे आणि तो अगदी व्याकुळतेने तुम्हाला बोलवून म्हणतोय 'बाबा या माझी मदत करा मला ह्या संकटातून वाचवा' अशावेळी मला अगदी मनापासून सांगा तुम्ही जाल की नाही? नक्कीच जाऊ हेच ह्याचे उत्तर असेल. आपल्या लाडक्याची मदत करायला तुम्ही नक्कीच प्राणांची बाजी लावाल होय ना? तर सांगायचं तात्पर्य हेच की तो परमात्मा हा आपल्या सर्व लेकरांचा बाप आहे. जर त्याला आपण मनापासून प्रेमाने, जाणीवपूर्वक साद घातली, तर तो बाप आपल्या मदतीला नक्कीच येईल. ह्यात शंकाच नाही. ह्यात मुख्य गोष्ट पुन्हा सांगतो की परमात्म्यावर तुमचा अढळ अतूट विश्वास असायलाच हवा. हा सर्व खेळ प्रेम आणि विश्वासाचाच तर आहे. कारण ज्याच्यावर आपण सर्वात जास्त प्रेम करतो त्याच्यावरच तर सर्वात अधिक विश्वासही ठेवतो नं! पण हो! प्रेम आणि विश्वास ठेवण्याआधी त्या परमात्म पित्याची खरी ओळख आपल्याला असायलाच हवी. त्याला नीट ओळखा तर खरं! आजपर्यंत मंदिरात, घरात, देवी-देवता किंवा अनेक शरीरधारी व्यक्तींना परमेश्वर समजून आपण त्यांची पूजा करत आलोय, आरत्या, भजन, कीर्तन, काय काय करत आलोय आपण! तरीही दुःखाची, खेदाची गोष्ट म्हणजे आपण आपल्या ह्या लाडक्या परमात्म्याचं खरं रूप ओळखूच शकलो नाही.

हे सर्व वाचल्यानंतर इतकेच म्हणावेसे वाटते की आता ह्या क्षणी तुम्ही स्वतःशीच पक्के करा की जोपर्यंत मी आत्मा ह्या भौतिक शरीरात आहे, परमेश्वरावरील माझा विश्वास श्रद्धा कधीच ढळू देणार नाही. अनुभव घ्या मग बघा की त्याची आठवण तुमच्या बरोबर असेल, तर मग कोणतेही संकट तुमच्या आसपास सुद्धा फिरकू शकणार नाही.?

जर तुम्हालाही परमात्म्याचा सत्य परिचय जाणावयाचा असेल, त्याला भेटायचे असेल, याची देही याची डोळा ही अनुभूती करायची असेल, तर तुमच्या जवळच्या ब्र.कु. सेवा केंद्रावर नक्की भेट द्या आणि ७ दिवसांच्या राजयोग कोर्समध्ये तुम्हाला तुमच्या सर्व प्रश्नांची उत्तरं जरूर मिळतीलच हा कोर्स एकदम विनामूल्य आहे. तुम्हाला जीवनाची एक नवी दिशा मिळेल हे मी अगदी ठामपणे सांगू इच्छितो. राजयोगाद्वारे आपल्याला सरळ परमेश्वराशी संबंध प्रस्थापित करता येतो.

***

## फुकटचा सल्ला

लक्षात ठेवा असे ज्ञान कुणाच्याही कामी येत नाही – जोपर्यंत तुमच्याकडे कुणी काही विचारायला येत नाही, तोपर्यंत तुम्ही कुणालाही सल्ला देण्याच्या भानगडीत पडू नका. कारण फुकटचा सल्ला कुणालाच नको असतो. त्याला काहीच किंमत नसते. कुणीतरी असे म्हटले आहे की, जगात जो सर्वांत जास्त दिला जातो, पण सर्वात कमी स्वीकारला जातो, तो म्हणजे सल्ला! कारण तुम्ही तो फुकट वाटत असता, मग घेणाऱ्याला त्याची किंमत कशी कळणार ! तसेच मागितल्याशिवाय जरी तुम्ही सल्ला दिला तरी कुणीच घेत नाही. कृपा करून स्वतःजवळ असलेले ज्ञान असे व्यर्थ वाटत सुटू नका. पण ज्याला ह्याची कदर असेल. त्यालाच ज्ञान द्या. फुकटचे ज्ञान वाटणे खूपच धोकादायक तसेच मनस्ताप देणारे ठरते. अशाच व्यक्तींमुळे लोकांच्या मनात ज्ञानाबद्दल अरुची निर्माण झाली आहे.

# परीकथा

(भाग १६)

## रावणाला काय दहा तोंडे होती?

ब्र.कु. रेखा, देगलूर



आज आम्ही म्हणजेच राधा, मी (शामा) व तिचे बाबा खूप खूप खुश होतो. कारण आज आमच्या लाडक्या राधेचा वाढदिवस होता. तिच्या बाबांनी तिला सकाळीच वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या आणि तिला विचारलं, ''बाळा आज तुला काय पाहिजे ते सांग.''

राधा म्हणाली, ''बाबा मी मागेन ते द्याल? मला प्रॉमिस करा की मी मागेन ते तुम्ही द्याल.'' बाबा म्हणाले, ''हो बाळा! तू सांग तर आधी तुला काय हवंय.''

राधा म्हणाली, ''बाबा रोज तुम्ही मला ईश्वराच्या शाळेत न्यायचं, तुम्ही जसं रोज जाता मलापण तिथे रोज जायचं आहे.'' बाबा राधेला अगदी जवळ घेत म्हणाले, ''बाळा तू तर खूप छान मागितलंस, मी तुला प्रॉमिस करतो की रोज तुला आपल्या बाबांच्या घरी घेऊन जात राहीन.''

असं म्हणत बाबा ऑफिसची तयारी सुरू करत होते एवढ्यात बाबांचे दोन मित्र घरी आले व म्हणाले,

''अरे राधा बाळा जरा इकडे ये बघ आम्ही तुझ्यासाठी काय आणलं आहे. वाढदिवसाच्या खूप खूप शुभेच्छा बाळा.''

असं म्हणत राधेला एक गिफ्टचा बॉक्स दिला. तिने त्यांना खूप खूप धन्यवाद दिले. त्या दोन्ही काकांनी तिला प्रेमाने जवळ घेतलं व मला म्हणाले, 'बाळा गिफ्ट तर उघडून बघ ना!' तिने गिफ्ट उघडली तर त्यामध्ये एक सुंदर असा फ्रॉक होता तोही पांढराशुभ्र मला खूप आवडला होता. मग दुसऱ्यामध्ये एक सुंदरशी बाहुली होती व तिला पांढराशुभ्र फ्रॉक घातलेला होता. तिच्या डोक्यावर मुकुट होता. मस्तकात एक चमकता हिरा होता. हातात एक कांडी होती. जणूकाही तिच्या स्वप्नातल्या परीचे छोटे रूप होते ते आणि हिरा खूप चमकत होता.

राधा बाबांना दाखवत म्हणाली, ''बाबा माझ्या स्वप्नातली परी सुद्धा अशीच आहे बघा'' मग काकांनी तिला अगदी जवळ घेऊन विचारले,

''स्वप्नातली परी? बाळा तुझ्या स्वप्नात अशीच परी येते का?''

राधा म्हणाली, ''हो काका गेल्या काही दिवसात मला परी भेटली नव्हती म्हणजे साधारण दीडेक महिन्यात; पण अगदी परवाच माझ्या स्वप्नात आली होती. तुम्ही जी बाहुली दिलीत तशीच एक परी माझ्या स्वप्नात येते व मला एक नवीन कथा सांगते व ती कथा मी सर्वांना सांगते.'' काका बाबांकडे पहात मला म्हणाले, ''असं काय बाळा, आम्हाला तर माहीतच नव्हतं तुझ्या परीची कथा आम्हाला सांगशील का राधा''

परीला असं समोर ठेवून राधेने गोष्ट सांगण्यास सुरुवात केली.

''काका मी तुम्हाला सुरुवातीच्या गोष्टी थोडक्यात सांगते म्हणजे तुम्हाला ही गोष्ट समजेल.''

मग राधेने सुरुवातीच्या गोष्टी थोडक्यात सांगितल्या पुढे राधा म्हणाली, ''काका काल परीने तर मला खरा रावण कसा दिसतो कुठे राहतो काय करतो हे सांगितलं.'' काका म्हणाले, ''असं काय बाळा, रामायणातल्या रावणाची कथा तुला सांगितली असेल.'' राधा म्हणाली, 'हो काका, मला पण अगदी तसंच वाटत होतं. पण परीने तर मला कलियुगातल्या रावणाची गोष्ट सांगितली. काका हसले व म्हणाले, ''बाळा, कलियुगातला रावण मी तर आजच ऐकत आहे. बरं! सांग तर कलियुगातला रावण कोण व कसा आहे ते.'' ''काका परी माझ्या स्वप्नात एक सुंदर विमानात बसून आली होती. येताना ती माझ्यासाठी सुंदर एक हिऱ्याचा हार घेऊन आली होती. एकदम अप्रतिम सुंदर होता आणि हो! खूप हलका सुद्धा होता. मी परीच्या अगदी जवळ तिच्या कुशीत जाऊन बसले. ती पण मला खूप प्रेमाने जवळ घेऊन बसली होती. परीने मला नवीन प्रकारचा खाऊ आणला होता.'' परी

मला म्हणाली, ''राधा बाळ, तुला माहीत आहे का? रावणाला किती तोंडे होती?''

राधा : मी परीला पटकन म्हणाले, ''अय्या परी तुला तर माहीतच नाही की रावणाला तर दहा तोंडी होती. दरवर्षी की नाही आम्ही दसऱ्याच्या दिवशी तिकडे मोठ्या पटांगणात खूप मोठा रावण करून जाळतात. मी बाबांसोबत दरवर्षी तिथे जाते.''

''बाळा तुला माहीत आहे रावणाचे दहन का करतात?'' परीने मला विचारले मी म्हटलं, ''नाही मला तर एवढेच माहीत आहे की रावण हा फार मोठा राक्षस होता. दहा तोंडाचा राक्षस होता आणि तो श्रीलंकेचा राजासुद्धा होता व श्रीरामाने त्याचा वध केला एवढेच मला माहीत आहे पण बरोबर आहे का?''

परी म्हणाली, ''बरोबर आहे बाळा, भारतामध्ये दरवर्षी विजयादशमीला रावणाची प्रतिमा जाळतात. वर्णनानुसार रावण हा दहा तोंडाचा राक्षस व श्रीलंकेचा राजा सुद्धा होता आणि हो बाळा रामाची सीतासुद्धा ह्याच रावणाने अपहरण करून घेऊन गेला होता. त्याला अभिमान होता. की माझ्या एवढा श्रेष्ठ या जगात कोणी नाही. माझ्या एवढा बलाढ्य कोणी नाही आणि हो त्याचे वैशिष्ट्य म्हणजे तो फार मोठा विद्वान होता. वेदशास्त्रात निपुण होता. हट्टी होता. विपरीत बुद्धीचा होता.'' मी परीला म्हणाले, ''हो बरोबर आहे. आम्ही रामायणात त्याला टीव्हीवर पाहिलं होतं. असा दहा तोंडाचा खूप मोठा राक्षस दाखवतात.''

परी हसून म्हणाली, ''बाळा १० तोंडाचा मनुष्य कोणी असतो का कधी? शिव परमात्मा या धरतीवर येऊन असं सांगतात की रामायणातल्या रावणाला रामाने मारले ही एक बोधकथा आहे. यातून काही शिकवण घेणे महत्त्वाचे आहे. आजच्या जगात प्रत्येकाला पाच विकारांनी ग्रासलेले आहे. एकमेकांवर वाईट दृष्टी ठेवणे, हत्या लूट-मार असे अनेक दुर्गुण मनुष्यात दिसतात. अशी कामे करणे म्हणजे रावणाचे प्रतीकच होय.'' मी परीला म्हणाले, ''म्हणजे असा दहा तोंडाचा माणूस नव्हता? हे सगळं समजावण्यासाठी आहे का? पण याचा विचार तर कोणी केलाच नाही.''


यावर परी म्हणाली, ''बाळा म्हणूनच तर शिव परमात्मा कलियुग संपल्यावर संगमयुगात येऊन आपल्याला अज्ञान अंधकारातून बाहेर काढतात. या विश्वात पूर्वी सत्ययुग, त्रेतायुग होऊन गेले. तिथे मानव पवित्र प्रवृत्तीचा होता म्हणजेच देवत्व प्राप्त झालेल्या स्थितीत होता. त्यालाच रामराज्य असेही म्हणता येईल. पुढे द्वापार व कलियुगात मनुष्य विकाराधीन झाला त्याला रावणराज्य म्हणावे लागते. हेच खरे रहस्य आहे रावणाचे. कलियुगात सर्व मनुष्य मायेच्या अधीन झालेले आहेत. पाच विकार स्त्रीमधील आणि पाच विकार पुरुषातील असे मिळून दहा तोंडाचा रावण चित्र रूपात दाखविला आहे. मनुष्य हा पाच विकारामुळे धर्मभ्रष्ट कर्मभ्रष्ट बनला आहे. आज सर्वत्र दुःख अशांती पसरण्यामागे हेच खरे कारण आहे. तीळमात्रही सुख नाही. मनुष्याची वृत्ती, कृती ही असुरी बनलेली आहे. रावण हा रामायणातच नाही, तर सगळीकडे भरलेला आहे.'' एवढं बोलून परी एक दीर्घ श्वास घेतला मी तिच्याकडे खूप आश्चर्याने पाहत होते. मी तिला विचारले, ''परी मला एवढंच म्हणायचं आहे की हे सगळं बदलेल का ग! सगळीकडे शांती प्रेम होईल का?'' परी पुढे म्हणाली, ''हो बाळा ! नक्कीच बदलेल. विश्व परिवर्तनासाठीच आपले शिवबाबा या धरतीवर आलेले आहेत रावण राज्य कलियुगाची समाप्ती होणार. शिव परमात्म्याने आपल्यासाठी या संगम युगात येऊन राजयोग शिकवत आहेत. तीच लिफ्ट आपल्याला नवीन युगापर्यंत पोहोचविणार. शिव परमात्म्याने दिलेली आपल्यासाठी गिफ्ट आहे. फक्त या विकारावर विजय मिळवायचा आहे. आणि निरंतर शिव परमात्म्याच्या आठवणीत राहायचं आहे'' एवढे बोलून परी अंतर्धान पावली आणि मला मात्र सकाळीच जाग आली.

राधा थोडीशी हिरमुसली होऊन बसली होती. मग बाबा तिच्या जवळ येऊन राधाला म्हणाले, ''बाळा, आज तर तुझा वाढदिवस आहे ना!'' राधा म्हणाली, ''हो बाबा परंतु आपण सर्वात आधी शिवबाबांच्या घरी जाणार नंतरच मी बर्थडे साजरा करणार.''

काका म्हणाले, ''बाळा तुझ्या परीने तर कलियुगातल्या रावणाला सर्वांसमोर आणलं, रावणाच्या दहा तोंडाविषयी आज कळलं, प्रत्येकाने जर आपल्यातल पाच विकारावर विजय मिळवला तर नक्कीच राम राज्य सुरू होईल.''

आज तुझ्या या छोट्याशा गोष्टीमुळे मला बरच काही समजलं बाळा ! तुला पण धन्यवाद ! तुझ्या

(पृष्ठ क्र.२३ वर)



ब्रह्मावत्सांकरिता

# छाटणी

ब्र.कु. उषा दीदी, मधुबन

एकदा असेच बसले असताना मी गुलजार दादींशी सहज गप्पा मारताना विचारले, 'दादी, तुम्ही सर्वजण साकार बाबांकडे राहायला होता, तो काळ सत्त्वप्रधानच म्हणावा लागेल. बाबांबरोबर राहत असतानाचा तो काळ फारच सात्त्विक असा होता. आम्ही तुम्हां सर्व दादींबरोबर राहत होतो, तीही सत्त्वगुणी स्थिती म्हणावी लागेल. पण काळ जसाजसा पुढे-पुढे सरकत गेला, तसतसे ब्रह्मावत्सांना बघून काय वाटते? हळूहळू पुढे जायचे सोडून मागे जातोय की काय असे वाटू लागले आहे. आणि असे वाटत असूनही बाबा मात्र म्हणत आहेत की 'समय आपके लिए रुका हुआ हैं' (काळ तुमच्यासाठी थांबला आहे.) ह्याचा अर्थ काय होतो की आपण जोपर्यंत सम्पूर्ण अवस्थेस पोहोचणार नाही, तोपर्यंत सृष्टी-परिवर्तन होणारच नाही? पण जेव्हा आपण स्वत:ला बघतो, ब्राह्मण परिवार बघतो, तेव्हा सत्त्वप्रधानतेकडे न जाता मागे मागे जातोय? तर विनाश होणारच नाही का?' ह्या प्रश्नाचे उत्तर देताना दादी म्हणाल्या, 'हे बघ, ब्राह्मण सुद्धा एक धर्म आहे. जगात आत्तापर्यंत जेवढे जेवढे धर्म आले. त्या सर्वांना ४ अवस्थांतून जावेच लागते. (This is law of nature) हा निसर्ग नियमच आहे. सत्त्वप्रधान, सत्त्व, रजो आणि तमो. तमो झाले, की पुन्हा परिवर्तन होते. तर सांगायचा मुद्दा हा की, ब्राह्मण सुद्धा एक धर्म आहे. बाबा ३ धर्माची स्थापना करतात. ते दोन धर्म (देवता, क्षत्रिय) तर नंतरचे झाले. पण ह्या आत्ताच्या ब्राह्मण धर्मालाही ४ अवस्थेतून जावेच लागते. 'दादी पुढे म्हणाल्या, 'आत्ता तर अजून तुम्ही काहीच बघितले नाही. थोडा काळ पुढे सरकू दे, खूप काही दिसून येईल. ते बघून तुम्हा सर्वांना वाटेल – हाच का तो ब्राह्मण धर्म !' अशा अशा गोष्टी ज्यांचा आपण कधी विचारही केला नसेल अशा गोष्टी ब्राह्मण धर्मात बघायला मिळतील.'

मी म्हटलं, 'दादी मग तर विनाश होणे शक्यच नाही. कारण हा जो काळ (वेळ) आहे तो आमच्यासाठी थांबलाय, दादी म्हणाल्या, 'नाही, असे कधीच होत नाही बरं का ! पण जेव्हा एखादी गोष्ट तिच्या ४ थ्या अवस्थेला येते, तेव्हा त्या गोष्टीमध्ये दुही निर्माण होते. (पार्टीशन) त्यातील एक गट विचार करेल, 'ह्यापेक्षा तर ते जुने जगच चांगले होते. इथेही ह्या ब्राह्मण जगातही हेच चाललंय. मग जगात आणि ब्राह्मणात काय फरक? असे म्हणून ते जुन्या जगात परत जातील.' दुसरा गट असा विचार करेल, 'आता कुणाकडेच बघायचे नाही. फक्त एक बाबा दूसरा न कोई.' हे लोक इतके पक्के निश्चय बुद्धी होतील, की ते फक्त आणि फक्त बाबांकडेच बघतील. बाबांनी जी शिकवण दिली आहे. त्याच श्रीमताकडे ते बघतील. अशी मुलं आपली खरी तपस्या सुरू करतील. ही सर्व रणधुमाळी बघून त्यांना इतके वैराग्य येईल की, ते आपल्या तपस्येत रमतील. कुणाकडे बघायचे नाही, बाबांनी काय म्हटले आहे, बाबांचे ज्ञान तर वाईट नाही ना! लोकांच्या कर्माकडे आपण का बघायचे? ते तर प्रत्येकाचे व्यक्तीगत आहे.' ज्या लोकांनी विचार केला ह्यापेक्षा जुने जगच चांगले, ते जुन्या जगात परततील – ह्याचा अर्थ काय तर त्यांच्यात 'निश्चयाची', विश्वासाची कमतरता आहे. परमेश्वर अशा निश्चयहीन, अविश्वासू लोकांना त्याचा 'वारसा' देईल का? म्हणूनच अशा वेळी 'छाटणी' होईल. झाड हलेल. आणि मग जी शक्तीहिन पानं आहेत, ती गळणारच. कारण अशांना बाबा आपला वारसा देणारच नाही. पण जे पक्के निश्चय बुद्धी असतील. 'एक बाबा दूसरा न कोई' बाबांना बघून त्यांच्या श्रीमतनुसार चालणारे – अशा आत्म्यांची खरी तपस्या सुरू होईल. ही बेहद वैराग्य वृत्तीची तपस्या असेल. जर वैराग्य वृत्ती नाही तर ती खरी तपस्या नसेल. म्हणूनच बाबा जे सांगतात कुणाकडेही बघू नका. फक्त See father and follow father. See brother, see sister करू नका. एक बाबा आणि बाबांचे श्रीमत बस ! ***



# योगात संकल्प शक्तीचा उपयोग कसा करावा?

**दिवंगत ब्र.कु. जगदीश भाईजी**

**(संदर्भ : ज्ञान सरीता – ५४)**

'योग' ह्या विषयाचे ब्रह्माकुमारीच्या अभ्यासक्रमात फार-फार महत्त्व आहे. बाकी इतर सर्व विषय देखील योगासाठी मदतच करतात. पण आपल्या जीवनाच्या हार-जीत, उन्नती-अवनतीचा प्रश्न – योगाशीच संबंधित आहे. बऱ्याच वेळा बाबा ह्याला स्पर्धेची उपमा देतात, यात आपण सर्व ब्राह्मण भाग घेत आहोत. आपल्याला पुढे जाण्यासाठी आपला पुरुषार्थ तीव्र करायचा आहे. त्या सर्व पुरुषार्थासाठी योगाचे महत्त्व फार मोठ्या प्रमाणावर आहे असेच म्हणावे लागेल. जो योगी बनेल, योग ह्या विषयावर लक्ष देईल.... ह्यासाठी केवळ योगीच नव्हे – योगाभ्यास त्याचा एक भाग आहे. पण आपले जीवन सुद्धा 'योगी-जीवन' असावे. योग-पद्धती आपल्या जीवनाची पद्धत असावी. योग्याचा दृष्टिकोण, आहार-विहार, योग्याचे झोपणे, उठणे, बसणे, योग्याची दिनचर्या सांसारिक लोकांपेक्षा वेगळी असते. आपले जीवन पण योगी जीवन असावे. तसेच आपण योगाभ्यासही करीत राहावे. – ह्यावर आपला सर्व पुरुषार्थ अवलंबून असतो. आपल्याला हेही कळले की आपला हा पुरुषार्थ येणाऱ्या २१ जन्म वा (अर्धेकल्प) २५०० वर्षांसाठी आहे. यावरूनच तुम्हाला अंदाज येईल, की योगाचे किती महत्त्व आहे.

बऱ्याच तत्त्वज्ञानात (philosophy) हा प्रश्न करतात, ज्या विद्येचा अभ्यास केल्याने, वा जी विद्या धारण केल्याने सर्व प्राप्ती होते. अशी विद्या कोणती? इतर कोणत्याही पुरुषार्थाची आवश्यकता नसणार – त्याचे उत्तर हेच असेल – स्वतःला ओळखण्याची विद्या. पण ही विद्या फक्त बौद्धिक वा शाब्दिक रूपात नाही. त्यासाठी आपण फक्त साप्ताहिक पाठ्यक्रमात समजून घेतले, की मी ज्योतिर्बिंदू आत्मा आहे. पण ओळखणे, समजून घेणे ह्याचा अर्थ आहे, अनुभव करणे. मी आत्मा आहे, आणि आत्मा जर शरीरापेक्षा वेगळी सत्ता आहे, तर त्याचा मला अनुभव व्हायला हवा. परमात्मा शांतीचा सागर, आनंदाचा सागर आहे, --- तर ह्या ही गोष्टीचा मला अनुभव व्हावा. अनुभव झाल्याशिवाय तो आनंद काय आहे कसे माहीत पडणार? तसेच परमात्म्याचे प्रेम काय आहे, कसे असते? सर्व लोक म्हणतात. परमात्मा प्रेमाचा सागर आहे. त्याच्या एका थेंबासाठी आम्ही आसुसलेले आहोत. पण त्यांचे प्रेम जर आम्ही मिळवले नाही, तसा अनुभव केला नाही, मग असा अनुभव करणे न करणे सारखेच असेल. ज्याद्वारे सगळ्या प्रकारचा पुरुषार्थ पूर्ण होतो अशी विद्या म्हणजे 'योग'. जसे कुणी एखादी व्यक्ती आजारी होते, तेव्हा त्यातून बरे होण्याचा पुरुषार्थ म्हणजे डॉक्टरांकडे जाणे. त्यांचे औषध घेणे. मग डॉक्टरी विद्या का महत्त्वाची आहे ? तर रोगाचे मूळ नष्ट करण्यासाठी. हा झाला पुरुषार्थ – आरोग्यपूर्ण जीवन जगण्यासाठी. अशाच प्रकारे माणसाला पोट भरण्याचे साधन (आजीविका) हवे, त्यासाठी त्याची आर्थिक बाजू मजबूत असावी (economic aspact) – धन पण एक आवश्यक गोष्ट आहे. धन कमावण्यासाठी माणूस कुठला व्यापार, उद्योग-धंदा करतो. हा झाला दूसरा पुरुषार्थ. ह्या शरीरासाठी किती गोष्टी आवश्यक आहेत. अशाच प्रकारे कमवून ते जमा करणे – मग तेच धन वापरून घर बांधणे, त्यात राहणे ह्या गोष्टी किती आवश्यक आहेत ! ह्या सर्व गोष्टींसाठी वेगवेगळा पुरुषार्थ करावा लागतो. एवढे करूनही आपल्याला थोड्या काळासाठी त्याची प्राप्ती होत असते. योग असा पुरुषार्थ आहे, ज्यामुळे आपण २१ जन्मांसाठी ह्या गोष्टी करण्यापासून मुक्त होतो. तिथे सत्त्वगुणी प्रकृती असल्याने रोगाचे नावही नसते. तिथे कोणत्याही प्रकारचे नैसर्गिक प्रकोप नसतात. तसेच

भांडण-तंटे, कारागृह पोलीस किंवा शेजाऱ्याशी मतभेद - अशा कोणत्याच गोष्टी नसतात. तर ज्याला आपण स्वर्ग अथवा सुखाचे जग म्हणतो, ते योगाशिवाय प्राप्त होणे शक्यच नाही, योगाशिवाय सर्व प्राप्ती होऊच शकत नाहीत. अशाप्रकारे खोलात गेल्यास कळेल, की योगाचे किती अनन्य साधारण महत्त्व आहे ते !

ह्या शेवटच्या जन्मातील जो काही थोडासा वेळ राहिलेला आहे, तीच वेळ आहे, पुरुषार्थ करण्याची. ६३ जन्माची विकर्मे आहेतच. आपल्याला ती दग्ध करायची आहेत. आपल्या मूळ स्थितीपेक्षा आपण किती खाली आलोय. रोज रोज विसरतो. रोज मुरलीत बाबा सांगतात, की आत्म-अभिमानी बना. Soul-concious बना, सारखे आपल्याला आठवण करवतात. पण हे सर्व ऐकूनही आपण ते विसरतो. थोड वेळ ट्रॅफीक कंट्रोलचे गीत ऐकतो तेव्हा थांबतो, थोडा योग करतो, पुन्हा विसरतो - आणि देह - अभिमानात येतो. अशी आपली स्थिती झालेली आहे. आपल्याला वाटते की आपले संस्कार, राग-द्वेष-घृणा ह्यांनी आपला पिच्छा सोडून द्यावा. पण एखादी परिस्थिती आली, की पुन्हा (राग-द्वेष-घृणा) येरे माझ्या मागल्या... आपल्याला वाटते की ते पळून गेलेत. पण तसे होत नाही. ते फक्त थोडे फार इकडे-तिकडे लपलेले असतात - संधीची वाट बघत असतात. संधी मिळताच पुन्हा समोर येतात. ह्या सर्व गोष्टी कमी वेळात करायच्या असतील, तर योगाशिवाय पर्याय नाही. म्हणूनच - योगी बना, योगी बना, योगी बना - हेच बाबा प्रत्येक मुरलीत सांगत असतात. ह्यावर जर पुरेसे लक्ष दिले नाही, तर आपण स्वत: एखाद्या गैरसमजूतीत राहतो. तुम्हाला जरी बऱ्याच गोष्टी समजल्या (ज्ञानाच्या) पण योगच केला नाही, योगाभ्यासाशिवाय तुम्ही आपल्या लक्ष्यापर्यंत कसे पोहोचाल? म्हणायला आपण कितीही म्हणू की, आता आपल्याला स्वगृही परतायचे आहे, मग ते तर विनाशात 'मच्छरों सदृश' सर्व आत्मे जातील, तर त्यातला एक डास (मच्छर) आपणही असू. ही गोष्ट वेगळी आहे. पण आपल्या पुरुषार्थांनी ती स्थिती आपण प्राप्त करावी - हे कधी शक्य आहे? जेव्हा आपण योगाचा अभ्यास करू तेव्हाच. त्याच योगाची चर्चा मी करत आहे. त्यासाठी मी सांगत होतो की आत्म्याच्या ज्या शक्ती आहेत, जसे इच्छाशक्ती (will power) किती प्रखर असली पाहिजे. उदाहरणार्थ - कुणी मनुष्य पाण्याशिवाय तडफडतोय. माशासाठी असे म्हणतात की, मासोळी पाण्याशिवाय तडफडते - ह्याच प्रकारे शिवबाबांना भेटायची आपली अशी इच्छा असावी की आपण त्याच्याशिवाय राहूच शकणार नाही. ह्या जगात प्रेमाच्या किती गोष्टी आपण ऐकत असतो - आपलेही मन बाबांच्या प्रेमात एवढे भरून पावावे की कुणाची कामांची यादी असते ना आधी हे काम करावे, नंतर ते - कामाच्या महत्त्वानुसार माणसे आपला प्राधान्यक्रम ठरवतात. तसेच आपल्या आत एक प्रकारचा अग्नि प्रदीप्त असावा. कितीही कुणी विझवायचा प्रयत्न करू दे तो विझता कामा नये, एक वेड, एक तडफड आपल्या जीवनात असावी - की - मी शिवबाबांचा आहे, मी योगी बनणारच आणि ती योगाची पराकाष्ठा काय असेल. माझी स्थिती कशी असेल, कशा प्रकारच्या अत्यानंदात मी रममाण असेन, मला काय हवंय? याची इतकी तीव्र तहान असेल - तेव्हाच प्रेमात मग्न अशी अवस्था निर्माण होते तेच 'वेड लागले राधेला' आहे. सगळ्यात मोठी गोष्ट इच्छेची असते. सायकॉलॉजी मध्ये सुद्धा म्हणतात. कोणत्याही पुरुषार्थासाठी तीव्र इच्छा निर्माण होत नाही जर प्रेरणा नसेल तर. तोपर्यंत तो ते कार्य कसे करणार? सर्व महाभारताचे मूळ कोणते? तर दुर्योधनाशी जे बोलणे झाले, दुर्योधन म्हणाला जानामि धर्मं न च में प्रवृति:।। धर्म काय आहे मला माहीत आहे. पण तशी माझी प्रवृत्तीच नाही, इच्छाच नाही - धर्मानुसार वागायची - धर्म-अधर्म चूक-बरोबर, कर्म-विकर्म ह्याची जाण मला आहे; पण मी अधर्म सोडावा ह्याचीही मला इच्छा होत नाही. मी धर्मही आचरू इच्छित नाही - अशी अवस्था एखाद्याची असेल तेव्हा त्याचा परिणाम काय होईल सांगा बर!

तर सर्वांत आधी - जसे लोखंडाला चुंबक जसे आकर्षित करते, तसेच आपला योग तात्काळ लागेल, एवढे आकर्षण होईल, शिवबाबा तर आपल्याला खेचतच आहे. पण गंज आपल्यावर चढलेला आहे. त्यामुळे आपण त्याच्या शक्तीने प्रभावित होत नाही आहोत. त्याचे कारण म्हणजे मनाची उघडी दारे ज्याच्याद्वारे मन उघडेल, मनाची ही कवाडे आहेतच की, समजा एखाद्या व्यक्तीने स्वत:ला एखाद्या खोलीत कोंडून घेतले आहे. बाहेर स्वच्छ सूर्यप्रकाश पडलाय, पण तो मात्र त्यापासून वंचित आहे. कारण त्याने त्या खोलीचे दरवाजे खिडक्या

सर्वच बंद करून ठेवले आहेत. पडदेही गच्च लावून घेतलेत. मग काय सूर्याचा एक किरण सुद्धा आत येत नाही. दिवस आहे की रात्र हेही कळत नाहीये. अशा वेळी काय होईल. ती पहिली आहे इच्छा. तुम्ही जेव्हा झोपता, तेव्हा इच्छा करता की आता काम बंद करु या. झोपायची वेळ झाली आहे. उठता तेव्हाही हीच इच्छा करत की आता आपली झोप झाली आहे, चला उठू या. कोणतेही कार्य, पुरुषार्थ ह्याच्या आधी इच्छा असते. इच्छेशिवाय कार्य होत नसते. ती इच्छा जेवढी तीव्र असेल, उत्कट असेल, आगीसारखी धगधगती असेल, तेवढाच योगाग्नि प्रज्वलित होईल. योगाची हीच तीव्रता आहे. पहिली प्रबळ इच्छाशक्ती - ज्याला म्हणतात. Heart, mind & soul. जेव्हा एखाद्या कामात आपण स्वतःला झोकून देतो, हरवून जातो. जेव्हा आपले मन त्या कामात मग्न होऊन जातो. तेव्हाच हे होते. मन जणू बुडून जाते आवडत्या गोष्टी. जेवढी आपली इच्छाशक्ती जास्त तेवढे त्या कार्यात मन लवकर लागते– की हे काम पूर्णत्वाला न्यायचेच आहे. जसे मुलगा कुठल्या कामात दंग झालाय पण त्याची आई येऊन त्याला म्हणते, 'बाळा, जेवून घे'. तो म्हणतो,' आई थांब जरा मला हे काम करू दे आधी' कारण मुलाची आत्ता खायची इच्छा नाही, भले भूक लागली असली तरी – बघा. उद्या परीक्षा असल्याने त्याचे पूर्ण लक्ष अभ्यासात आहे. म्हणूनच भूक असली तरी, खायची इच्छा नाही. पण अभ्यासाची इच्छा आहे. मग झोपायची वेळ झाली आहे, आई पण जेवायला बोलवत आहे – हेही माहीत आहे आईचे मन मोडू नये. मोठ्यांचा आदर ठेवावा – असे असतानाही त्याची इच्छा मात्र हे काम करण्याची (अभ्यासाची) आहे. म्हणूनच त्याचे मन अभ्यासात आहे. आई म्हणते जेवण गार व्हायच्या आत खा – लवकर ये – पण मुलासाठी सर्व गोष्टी आता गौण आहेत. आज त्याचे पूर्ण लक्ष अभ्यासावरच आहे. तर सांगायचा मुद्दा योगात सर्वात मोठी गोष्ट म्हणजे attention. मनाची एकाग्रता concenstration - mean hightend attention एकाग्रतेची पराकाष्ठा, एकाग्रतेची परम सीमा म्हणजेच concentration एकाच बिन्दूवर मन लावणे, टिकवून ठेवणे. एकाग्रतेच्या आधी येते, अटेंशन. जर आपले लक्ष जगातून निघाले नाही. तर ते शिवबाबांकडे कसे लागणार बरे? मग योगात आपण हेच करतो. शिवबाबांवर अटेन्शन देतो. सर्व बाजूंनी लक्ष काढून बाबांमध्ये लक्ष लावतो. आपली इच्छाच नसेल, तर अवधान कसे राहील? ज्या दिशेकडे इच्छा असेल, अवधान त्या दिशेने जाते. शिक्षक मुलांना म्हणतात, ''मुलांनो फळ्याकडे लक्ष द्या, मी शिकवतोय.'' पण मुलांची इच्छा काय, तर केव्हा एकदाची मधली सुट्टी होतोय आणि आपण मैदानावर खेळायला जातोय. गुरुजींचे तर रोजचेच आहे. कंटाळा येतो ऐकायचा. त्यांची इच्छा नसली तरी, डोळे फळ्याकडे आहेत. कारण गुरुजींनी म्हणायला नको, की तुझं लक्ष कुठे आहे? (stand up on the bench or get out) उठ बाकावर उभा राहा किंवा वर्गाबाहेर जा असे त्यांनी म्हणायला नको. बाहेरून जरी आपले लक्ष आहे असं दाखवत असला, तरी त्याच्या मनाचे attention नाहीये. मनाचे डोळे मैदानाकडे लागलेत. असे का? कारण त्याची इच्छा आहे जाऊन खेळावे. शेवटी काय, तर इच्छेच्या मागोमाग माणूस चालतो. तुम्ही भाऊ–बहिणी सेंटरला, मधुबनला का येता. कारण तुमची इच्छा असते, मुरली ऐकावी. ज्यायोगे तुमची उन्नती होते. व्यक्ती इच्छेच्या मागे धावत असतो. इच्छेची (lightend) पराकाष्ठा जे attention च्या रुपात लगन मे मगन अवस्था होते, – ती होईल. आपल्या तीव्र इच्छेपोटी. इच्छा अशी असावी की, त्या शिवाय राहूच शकणार नाही, त्याच्याशिवाय काहीच सुचणार नाही. जसे मनुष्य एखाद्या गोष्टीत हरवून जातो. – ही आहे पहिली पायरी.

(क्रमशः)

***

(पृष्ठ क्र.१९ वरून)

परीला सुद्धा धन्यवाद! शिव परमात्म्याला खूप खूप धन्यवाद !''

एवढं बोलून दुसरे काका म्हणाले, ''चला आता आम्हाला खूपच उशीर होतोय पुढच्या वेळेस मात्र राधा तुझी गोष्ट आम्हाला नक्की सांग व आम्ही येऊन ऐकू तुझी गोष्ट.''

मला परत एकदा वाढदिवसाच्या शुभेच्छा देऊन बाबा व काका दोघेही ऑफिसला निघून गेले. मग मी सहजच म्हटले,

''तूच माझा शिव परमात्मा
तूच करी अज्ञानरूपी अंधकाराचा नाश
साष्टांग नमन माझ्या सद्गुरूला''

मी व राधा बाबाला खूप खूप धन्यवाद देऊन आम्ही कामास सुरुवात केली.

***



# चालविसी हाती धरोनिया

ब्र.कु. वीणा, बहादूरगड

तुम्हाला सांगते आपल्या जीवनात येणाऱ्या प्रत्येक अडचणींवर मात कशाप्रकारे करावी ह्याची युक्ती बाबा आपल्या (मुरलीद्वारे अर्थातच) सांगत असतात. म्हणूनच मी सेवा केली असे म्हणणे फार चुकीचे वा अहंकारयुक्त ठरते. यावर मी एक अनुभव सांगते. माझे ज्ञानातील आयुष्य फार मोठे म्हणजे गेली ४५ वर्षे मी ज्ञानरसपान करतेय. त्यामुळे खूप परिवारांच्या संपर्कात येणे झाले. सुरुवातीच्या काळात मी सेंटरला राहायला लागले, तेव्हा त्या सेंटरवर फार कमी भाऊ-बहिणी यायचे. त्या काळात सेवाही करणे फार कठीण वाटायचे. २५-३० भाऊ-बहिणी होते. सेंटर म्हटले तर पहिल्या मजल्यावर होते. ज्येष्ठ नागरिक जास्त यायचे. त्यांना काही जमिनीवर मांडी घालून बसता येत नसे. म्हणून सर्वानुमते ठरले, सेवाकेंद्रासाठी ४-५ खुर्च्या आणूया. त्या काळात लोखंडी खुर्च्या असायच्या. बहुधा ५ रुपयाला एक अशी किंमत असावी. भाऊ-बहिणींनी आपसात वर्गणी काढून ५-६ खुर्च्या आणल्या. एक भाई गावी गेलेला होता, खुर्च्या आणल्या, त्याच्या दुसऱ्या दिवशी तो परतला. त्याने बघितले आणि विचारले, 'दीदी ह्या खुर्च्या कुणी आणल्या?' म्हटलं, 'सर्व भाऊ-बहिणींनी आपसात ठरवून आणल्या.' तो भाई थोडा दादागिरी करणारा होता, म्हणाला, ''दीदी कुणाला विचारून आणल्या ह्या खुर्च्या?'' मला तर विचारलेही नाही. मी, 'भाई तुम्ही तर गावी गेला होता, म्हणून जे हजर होते, त्यांनी आपसात ठरवून मला विश्वासात घेऊन विचारून मगच आणल्या.' भाई म्हणाला, 'असं कसं? मी कुणीच नाही का? माझ्या शिवाय सेंटर कसे चालेल? मला विचारल्या शिवाय तुम्ही खुर्च्या आणल्या कशा?' मी म्हटले, 'भाईजी हे बाबांचे घर आहे, मुलं बाबांची आहेत. मी इथे निमित्त teacher म्हणून बसले आहे, ते मला विचारून घेऊन आलेत. तुम्हाला का म्हणून विचारायचे?' त्यावर तो भाई खूपच वैतागला. ठीक आहे मग, हे बाबांचे घर आहे ना! बाबांनाच चालवू दे मग, आजपासून मी सेवाच करणार नाही, एवढेच काय मी सेवाकेंद्रावर ही येणार नाही जा...' मी शांतपणे म्हटलं, 'बरे, तुमची मर्जी'.

त्यानंतर तो भाई मुरली क्लासमध्ये आला नाही. तो खूप श्रीमंत म्हणजे गडगंज संपत्तीवाला शेठ होता. त्यामुळे जरा पैशांची गुर्मी होती त्याला. काही दिवस तो सेवाकेंद्रावर आलाच नाही. दुसऱ्या भाऊ-बहिणींनी मला विचारले, 'दीदी ते भाई का बरे येत नाहीत इथे मुरलीला?' मी त्यांना घडलेला किस्सा सांगून टाकला. त्यांनी असे म्हटले, मग मी असे म्हटले, 'बाकीचे भाऊ-बहिणी अवाक् झाले हे ऐकून म्हणालं, 'दीदी, अहो हे काय केलत तुम्ही! असं करायला नको होतं. तुम्ही आता असं करा, झाले ते झाले. आतातरी तुम्ही त्यांच्या घरी जा, क्षमा मागा. तुम्ही वयाने लहान आहात. ते वयाने, अनुभवाने मोठे आहेत.' मी म्हटलं, 'अहो, मी काही चूक केली, असे मला वाटत नाही. त्यामुळे क्षमा मागायचा प्रश्नच उद्भवत नाही. खरं पाहिलं तर ते तसेच होते. मी काहीच केल नव्हतं, उलट पक्षी तेच भाई गुर्मीत येऊन म्हणाले होते की माझ्यामुळे सेवाकेंद्र चालतं' मी म्हटलं, 'नाही तुम्ही चुकता सेंटर बाबा चालवत आहेत. खरं सांगा बरं. बहिणींना तुम्ही चालवता की बाबा ? आपण सेवा बहिणींसाठी करतो की बाबांसाठी की आपले भाग्य बनविण्यासाठी ? आपण बाबांसाठीही नाही, तर आपल्या भाग्यासाठी करतो. आता बघा हं बाबांचा चमत्कार काय झाला ते. तो भाई आला नाही जवळ जवळ ८ दिवस झाले तरी आला नाही. त्या दिवशी गुरुवार होता. सेंटरवर भोग वाटणे सुरू होते. सर्वजण बसले होते. अचानक त्या भावाची पत्नी माझे पति कधी

सेंटरवर यायची नाही. पण त्या दिवशी का कोण जाणे धावतच सेंटरवर आली. रडत रडतच मला म्हणाली, 'दीदी आज ८ दिवस झाले. खूप तापाने फणफणलेत. किती औषधे दिली तापच उतरत नाही १०३, १०४ डिग्री ताप चढलाय, तापातच त्यांचे बडबडणे चालू आहे. 'दीदी मला क्षमा करा, मला क्षमा करा' आता तुमचे आणि त्यांचे काय बोलणे झाले मला माहीत नाही. पण ते तापात खूपच बरळत आहेत. किती औषध केली पण फरकच पडत नाही. म्हणून तुम्ही कृपा करून एकदा घरी याल का? ते सारखे 'दीदी क्षमा करा' म्हणून याचना करीत आहेत. तुम्ही आलात तर काही मार्ग निघेल, कमीत कमी ताप तरी कमी होईल त्यांचा!' मला कळतच नव्हते काय बोलू ते. मी तर त्यांना कुठल्याही प्रकारचा शाप दिला नव्हता की ओरडले नव्हते तरीही आपल्याच परिवारातील भाऊ आहे, परिवारात कुणाशी कुरबूर झाली तरी आपण मनावर घेत नाही. मग आम्ही ४-५ भाऊ-बहिणी मिळून त्या भावाच्या घरी निघालो. तिथे त्यांना आम्ही बाबांची मुरली ऐकवून प्रसाद खाऊ घातला. मी म्हटले, 'जाऊ द्या ना भाऊ कुटुंब परिवार आहे आपला. त्यात गोष्टी येतात, तशा निघूनही जातात. पण आपण त्याच गोष्टीला धरून बसायचे नसते. तुम्हाला जर खरंच मनापासून वाटत असेल की मी चुकलोय, तर बाबांची क्षमा मागा आणि ह्यापुढे स्वतःला सांभाळा, सगळं ठीक होईल.' असे म्हणून आम्ही परतलो. तुम्हाला कदाचित खोटे वाटेल, पण विश्वास ठेवा १ तासातच त्याचा ताप उतरला. ही कपोलकल्पित कहाणी नाही बरं का! खरी घटना आहे. त्यावेळी मी फारच लहान म्हणजे फक्त १८ वर्षांची होते. फार काही अनुभव नव्हता गाठीशी. पण हा चमत्कार कुणाचा होता? बाबांचाच नं! म्हणूनच आपण सर्वांनी हे लक्षात ठेवावे. आपण कुणाची सेवा करत नाही, तर आपण आपले भाग्य स्वतःच निर्माण करतोय. आम्ही टीचरही teacher त्यासाठीच सेवा करतोय. भाग्य बनविण्यासाठी. तर आपण तन-मन-धनाची सेवा भाग्य बनावे यासाठीच करतो ना!

समजा कुणी बँकेत २ कोटी रुपये ठेवले असतील, तर त्या ठेवीसाठी तुम्ही असे म्हणाल का, की मी बँकवाल्यांना २ कोटी रुपये दिले. हे हास्यापद वाटेल ना! खरे सांगा, तुम्ही ते बँकेला दिले की आपल्या खात्यात ठेवले? आपल्याच खात्यात ना! मग अशाच प्रकारे बाबांची सेवा करणे म्हणजे ईश्वरी बँकेत आपण आपले जमा खाते उघडणे होय. आपण इतर कुणासाठी करतोय हा अहंकार मुळीच नको. मी खूप सेवा करतोय. माझ्याकडूनच हे शक्य आहे. पण उलट आपल्याला आनंद वाटावा, मला निमित्त बनवून कर्ता-करविता बाबा हे सर्व करवतोय. जेव्हा बाबांवर अतूट विश्वास असतो, तेव्हा आपला अनुभव, आपल्या शक्ती वाढत जातात.

मी माझा अजून एक अनुभव सांगते, 'मी त्या काळी आंध्र प्रदेशातील एका सेंटरवर होते. त्यांची तिथली भाषा मला येत नव्हती. तिथे तेलगू बोलतात. मी कर्नाटकाची असल्याने आमची भाषा कन्नड आहे. पण आंध्रावाले तेलगू भाषेत बोलतात. तिथे त्यांना कन्नड अथवा हिन्दी भाषा समजत नाही. ते फक्त तेलगूच बोलतात. पण त्या दिवसांत माझे तेलगू भाषेचे ज्ञान फारच कच्चे होते. तोडके मोडके बोलायचे. तिथे त्या दिवसात नवरात्री उत्सवाची वेळ असल्याने नवरात्रात देवीच्या पालख्या निघतात मंदिरातून. अशाच पालख्या निघाल्या आणि तिथे मध्येच एक मोठी मशिद लागत होती. नवरात्रीच्या शेवटच्या दिवशी दसऱ्याला १०८ पालख्या जात होत्या. त्या पालख्यांवर मशिदीमधून काही लोकांनी सोडा बाँब फेकले, हल्ला केला. त्यामुळे गोंधळ निर्माण झाला. काही लोक त्यात मारले गेले, काही जखमी झाली. त्यामुळे त्या भागात कर्फ्यू लागला. ह्या गोंधळाच्या परिस्थितीत खूपच पळापळ झाली. जिथे ही घटना घडली, त्याच्या जवळ बाजारात सेवाकेंद्र होते. आम्ही पहिल्या मजल्यावर राहत होते. ते सेवाकेंद्र म्हणजे फार छोटेसे घर होते भाडेतत्त्वावर घेतलेले. दुकानाची जाळपोळ झाली, खूप नुकसान झाले, त्यामुळेच अचानक कर्फ्यू लागला. हिंदू-मुस्लीम दंगे झाले. आम्हाला पाणी घेण्यासाठी तळमजल्यावर जावे लागे, तसेच प्रातर्विधिसाठीही खालीच व्यवस्था होती. पण कर्फ्यू लागताच सरकारने घोषित केले की दिसताच क्षणी गोळ्या घातल्या जातील. आम्ही थोडे पाणी भरून ठेवले होते. त्यावरच आम्ही २-३ दिवस काढले. थोडं थोडं खायचे, थोडं पाणी प्यायचो कारण टॉयलेटला जायची सोय नव्हती. असे होता होता थोडे सुद्धा पाणी शिल्लक नाही उरले. पाणी घ्यायला खाली जाणेही शक्य नव्हते. अशा वेळी काय करावे बरे? अमृत वेळेला उठून बाबांसमोर बसले. बाबांना म्हटले,

'बाबा हे काय हो, आम्हाला जर वर बोलावायचेच असेल, तर प्रेमाने बोलवा की पाणी नाही, घाबरलोय अशा स्थितीत तुमच्याकडे आम्हाला यायचे नाही. ह्याला काय अर्थ आहे? स्वतःकडे बोलवायचेच असेल, तर प्रेमाने बोलवा की!' अशा प्रकारे मी बाबांशी बोलत होते. अमृत वेळा पूर्ण झाली तरी उठून काय करणार, पाणी नाही तर काय करणार सारेच ठप्प. आम्ही असेच बसलो होतो. माझ्यापेक्षा लहान एक बहीण आणि मी १८ वर्षांची. तेवढ्यात खालून (तळमजल्यावरून) सेवाकेंद्राची घंटा वाजली. बेल जिन्याखाली होती. मी विचारले 'कोण?' आवाज आला, 'आम्ही पोलीस आहोत.' म्हटलं, 'पोलीस? अरे बापरे नकोच ते फार भयंकर असतात.' बघा लहानपणापासून हेच ऐकत आलो होतो नं! पोलीस म्हणजे नको रे बाबा! दार नकोच उघडायला. आम्ही काही दरवाजा उघडला नाही. पुन्हा पोलिसांनी आवाज दिला, 'हे बघा घाबरू नका, उघडा नाहीतर आम्ही बाल्कनीतून आत येऊ. आम्ही तुमच्या मदतीला आलोय.' 'नको आम्हाला तुमच्या मदतीची गरज नाही...' असेच बराच वेळ चालले; पण त्यांनी काही ऐकलेच नाही. शेवटी जरा चाचरतच आम्ही दरवाजा उघडला. ४-५ पोलीस २ स्त्री पोलीस सर्वजण आत आले. म्हणाले, 'तुम्ही एकट्या राहताय, तुम्हाला पाण्याची गरज आहे नं, आम्ही देतो तुम्हाला पाणी आणून. भाजी, दूध सगळं देते. तुम्हाला खोटं वाटेल, आम्ही खाली टॉयलेटला जायचो नं, आमच्या मागे-पुढे दोन-दोन बंदुकधारी पोलीस असत. असे साधारण ८ दिवस झाले असतील. ते लोक चहा पावडर, साखर, दूध सगळं आणत. आम्हाला चहा करून द्या. असे सांगत. कारण त्यांना चहाही मिळायचा नाही. सर्वच बंद. त्या ८ दिवसात आम्ही त्यांचा साप्ताहिक पाठ्यक्रम पूर्ण केला. ते यायचे बसून शांतपणे सर्व ऐकायचे. ८ दिवसानंतर अजूनच भीषण स्थिती खूप गोंधळ-गोंधळ. पुन्हा मारामाऱ्या, खून तेव्हा पोलीस म्हणाले, 'आता तुम्ही इथे राहू नका. इथे फार धोका आहे, पूर्ण शहर पेटलंय. तुम्ही असं करा कर्नाटकला जा.' त्यांनी मग आम्हाला ट्रेनमध्ये बसवून कर्नाटकात पाठवण्याची व्यवस्था केली. मग जेव्हा सारे काही आलबेल आहे, असे दिसले तेव्हा १ महिन्यांनी आम्ही पुन्हा सेवाकेंद्रावर आलो. त्याच्यापुढे काय झाले ते सांगते, ही गोष्ट जी झाली ती साधारण १९८२ च्या आसपासची. काही वर्षांपूर्वी जेव्हा करोना महामारी झाली होती न, त्याची नुकतीच सुरुवात होती. मी मार्च महिन्यात दिल्लीला आले होते. परतताना माझे ट्रेन तिकिट होते. पण सर्वानुमते मी ट्रेनने न जाता विमानाने जावे असे ठरले. त्यामुळे मी विमानाचे तिकिट काढले, कारण करोना वाढत होता. गंमत म्हणजे माझी थेट विमानाची फेरी रद्द होऊन मला हैदराबाद मार्गे जावे लागले. दिल्ली ते हैदराबाद मग हैदराबादहून वेगळे विमान. हैदराबाद विमानतळावर बसून मी पुढच्या विमानाची वाट पाहत होते. त्याला ४ तास वेळ होता. माझ्या समोर (मी जिथे बसले होते) एक भाई आला. मोठ्ठी लाल रंगाची दाढी वाढवलेला अर्थातच मुस्लीम होता. म्हणाला, 'दीदी आपण मला ओळखले का?' माझा गोंधळलेला चेहरा बघून तोच म्हणाला, 'अहो, त्या सेवाकेंद्रावर नाही का तुम्ही आमचा साप्ताहिक पाठ्यक्रम घेतला होता!' तो माणूस म्हणजे ज्या शहरात गडबड-गोंधळ होऊन कर्फ्यू लागला होता. त्यावेळी ज्याने आम्हाला मदत केली होती, तो पोलीस अधिकारी होता तो. त्याने आम्हाला मदत केली होती हा किस्सा ही फार मजेशीर आहे. तो जेव्हा मदतीला आला होता, तेव्हा मी त्याला विचारले होते,'तुम्हाला कुणी पाठवले आहे मदत करायला? तुम्हाला कसे कळले? तुम्ही का आणि कसे आलात?' तो म्हणाला, 'दीदी मी नमाज पढत असताना (सकाळी ४-५ वाजता). त्यावेळी मला दोन देवदूत दिसले श्वेतवस्त्रधारी. तेव्हाच आवाज आला ह्या देवदूतांना तुझ्या मदतीची गरज आहे. तुला जावे लागेल.' नमाज झाल्यावर त्याने आपल्या सहकाऱ्यांना विचारले, इथे आसपास कुठे नन्स (ख्रिश्चन साध्वी) राहतात का? मला श्वेतवस्त्रधारी दोन मुली दिसल्या, सांगा बरं त्याला हे दृश्य कुणी दाखवले असेल? (बाबांनी) मी बाबांकडे जे बोलले होते त्याप्रमाणे बाबांनी त्या व्यक्तीला तसे दृश्य दाखवले. बाबांनी त्याच्याद्वारे आम्हाला मदत केली. तीच व्यक्ती मला हैदराबाद विमानतळावर दिसली. ४० वर्षानंतर तो मला भेटला. म्हणाला, 'दीदी, तुम्ही त्या ८ दिवसांत जे ज्ञान दिले होते, त्यानंतर मी ब्रह्माकुमारी संस्थेत जायला सुरुवात केली. तो आता बाबांचा पक्का बच्चा झालाय. त्याच्या दोन मुली, त्यांनीही लग्न केले नाही. मुली मिलीट्रीमध्ये आहेत. आम्ही सर्वजण ज्ञानात चांगले चालतोय. पण आता इतक्यात मी

मक्केला जाऊन आलोय. म्हणून दाढी वाढवली आहे' असे तो म्हणाला. ह्या प्रसंगावरून आपण काय शिकायचे तर कलियुगात बाह्य परिस्थिती येणारच त्यातूनही कलियुगाचा अंत आहे म्हणून रोज नवनवीन अडथळे येणारच. पण येणाऱ्या अडचणींमध्ये न घाबरता मनाची स्थिती मजबूत ठेवायची आहे. प्रत्येक परिस्थितीत आपल्याला आंतरिक स्थिती ढळू न देता मजबूत राहून बाबांच्या श्रीमत नुसार चालायचे आहे.

छोट्या गोष्टीत दीदी हे असं आहे, तसे आहे, क्षुल्लक गोष्टी, सून काही बोलली, सासू माझ्याशी बोलत नाही, ही अशी बोलली, मुलगा मला विचारत नाही अशा हजारो अडचणी घेऊन माता येतात. हे तर म्हणजे घरोघरी मातीच्या चुली. चालूच राहणार त्यासाठी वैतागून कसे चालणार हो! विघ्न-अडी-अडचणी येतात नं, तेव्हाच आपण बाबांची जास्त तीव्रतेने आठवण करतो. सारे काही आलबेल आहे असे दिसताच बाबांची आठवण आपण विसरतो. खरे की नाही? बाबांनी म्हटलंय शेवटपर्यंत ह्या अडचणी, विघ्न येणारच. पण त्यात ही आपणास कुणाची आठवण असावी? अर्थातच बाबांची. बाबांनी तुमचा हात पकडलाय की तुम्ही बाबांचा? (आम्ही बाबांचा) म्हणजे याचा अर्थ काय की तुमचा हात सुटतो ना! म्हणून काय लक्षात ठेवायच मी बाबांचा हात पकडला नाही, तर बाबांनीच माझा हात पकडलाय. तुम्ही कितीही प्रयत्न केले, तरी सोडवू शकाल का? बाबा सोडेल का तुमचा हात? काय वाटते (नाही सोडणार) खरेच ना ! चुका झाल्या की बाबांसमोर यायला लाज वाटते. म्हणून हातच सोडून पळून तर जात नाही? जगाच्या बाजारात हरवत तर नाही ना ! पण लक्षात ठेवा तुम्ही हरवलात तरी बाबा तुम्हाला नक्कीच शोधून काढेल. खूप घट्ट हात धरलाय 'त्या' ने. बरं हे झाले. आता मला सांगा किती मातांना राग करणे आवडते? आवडत नसले तरी येतो ना ! कुणी शिकवले राग करायला ? ब्रह्माकुमारी संस्थेत शिकवतात का? मग तुम्ही का बरे रागवता? राग करावा की नाही? राग केल्याने कुणाच्या घराचा उद्धार झाला का? कुणाची प्रगती झाली का? कुणाकडून पुण्याचा वाटा झाला का? मग का बरं राग करता? आज एक गोष्ट सांगते. तुम्हाला - राग करणे वेगळे आणि तसा आव आणणे वेगळे - जसे मुलांना घाबरवण्यासाठी आपण खोटे-खोटे रागवतो न, लटका राग करतो, मुलांवर खरेच रागवता की तुम्ही? मोठे-मोठे डोळे करून ओरडता. पण हे सर्व आतून नसते. वरवरचे असते. अशाप्रकारे रागवण्याचे नाटक करणे वेगळी गोष्ट आहे. पण आतून दात-ओठ खात राग करणे वेगळे. तुम्ही काय करता आतून रागवता, ओरडता, कपाळाला आठ्या घालून तोंड वेंगाडता -- हे आता नाही हं करायचे. म्हणूनच असे म्हणतात की लक्ष्मणाने ३ रेषा मारल्या होत्या सीतेसाठी. सीतामाईने त्या ओलांडल्या आणि मग पुढील नाट्य तर तुम्हाला माहीतच आहे. रावण घेऊन गेला तिला. आपल्याला ही ३ रेषा मारायच्या आहेत. कोणकोणत्या? कधी? १) पर-चिंतन, २) व्यर्थ - चिंतन आणि ३) पर-निंदा करायची नाही. अशुभ - चिंतन कधीच करायचे नाही. व्यर्थ आणि परचिंतन ह्यांपासून सावध राहावे. त्याऐवजी १) स्वचिंतन, २) शुभचिंतन आणि ३) प्रभू चिंतन करायचे आहे. ह्या तीन रेषा मारा आणि त्या कधीच ओलांडू नका. तरच मग रागावरही नियंत्रण आणू शकाल. त्याने आपले शारीरिक आणि मानसिक आजार ही पळून जातील. तसेच अडी-अडचणींपासून ही सुटका होत राहील. आपण जेवढे आनंदी राहू तेवढेच आतून शांतपूर्ण जीवन जगू शकू. कुणाला माहीत आहे का, आपली शेवटची घटीका केव्हा येईल ते ! सगळे तयार आहात का? आपल्या लौकिक घरी नव्हे परमधाम घरी? आत्ताच्या आत्ता म्हटले चला, तर कोण-कोण परमधामात यायला तयार आहे? बघा ह्यात खोटेपणा चालणार नाही. खरे बोला. झूठ बोले कौआ काटे. परमधाम रुपी घरी जायला पेटी बांधून तयार आहात ?

रागासाठी आपण इतरांना काय सांगतो की, ज्यांच्या घरात क्रोध आहे त्यांच्या घरातील पाण्याचे माठही सुकून जातात हो ना! आपल्याला हे चांगलेच माहीत आहे. ह्यावर मी एक किस्सा सांगते - मी माझ्या लौकिक घरी राहत होते. एकदा माझे बाबा आजारी होते. त्यांना बरे वाटावे म्हणून घरात पूजा ठेवली होती. विष्णू सहस्रनामाची पूजा. कुणाला माहीत असेल की नाही, मला कल्पना नाही. विष्णूला शाळीग्रामाच्या रूपात ठेवून त्यावर तुळसीपत्र वाहतात, १००० तुळशीपत्र वाहतात. श्रीविष्णूंचा महिमा करण्यासाठी. ही एक वेगळीच पूजा असते. १६ आठवडे ही पूजा करतात. मग त्यानंतर समाप्ती करतात. तो समाप्तीचा दिवस होता. त्या दिवशी १६ हजार तुळशीपत्र वाहतात शाळीग्रामावर. नंतर गीतेचा पाठही

करतात. एक (ब्राह्मण) गुरुजी गीता पाठ करत होते. दोघेजण पूजा करवत होते. आणि समोर एक मोठे गुरुजी बसलेले होते. आम्ही घरातले सर्वजण आणि नातेवाईक मिळून १५० सदस्य होतो. ते गुरुजी गीता ऐकवत होते. कहाणीच्या स्वरुपात. गीतेत दुसऱ्या अध्यायात २ श्लोक येतात-रागाबद्दल. त्याचा अर्थ असा - जो विषय विकारांचे चिंतन करतो, त्या व्यक्तीला (संग) सोबतही अशाच प्रकारच्या लोकांची मिळते. सोबतीनेच काम विकार बळावतो. कामाने मग क्रोधाचा शिरकाव होतो. क्रोधाच्या मागे मोह येतो. मोह स्मृतीचा (ईश्वराची) नाश करतो. स्मृतीचा नाश झाला की, मग बुद्धिचा नाश होतो. आणि बुद्धिचा नाश झाला की सर्वनाश झालाच समजा. म्हणजे वाईट सोबतीने काम, क्रोधादि विकार येतात. मग हळूहळू सर्वनाश होतो. गुरुजींनी ह्या श्लोकाचा अर्थ फार चांगल्या पद्धतीने वर्णन केला. गुरुजींची कथा, श्लोक, अर्थ सांगणे चालूच होते. तेवढ्यात काय झाले, सर्वांबरोबर त्याची लहान मुलेही होती. आमच्या काकांचा अडीच वर्षांचा एक लहान मुलगा होता. तो एकाएकी जागेवरून उठला, धावतच गुरुजींकडे गेला. गुरुजींजवळ गोड-धोड पदार्थ, आरतीचे ताट, फळे, फुले, पाने, दिवा.. सर्वच असते. त्याचेच त्या लहानग्याला आकर्षण झाले असावे. तो असा धावला, की गुरुजींच्या अंगावरच जाऊन पडला. गुरुजी रेशमी कद, उपरणे टोपी घालून सोवळ्यात बसले होते. तो लहानगा त्यांच्यावर पडला. तेव्हा त्यांना वाटले आता मी अपवित्र झालो. त्यांना जो राग अनावर झाला न, त्यातच त्यांनी पितळेची घंटी उचलली आणि त्या बाळाला मारली. त्याला डोक्यावर जखम झाली, रक्ताची धार लागली. ५ मिनिटं आधी गुरुजी काय सांगत होते? क्रोधाने सर्वनाश होतो. आणि बघा ५ मिनिटांनंतर काय झाले? त्या दिवशी पहिल्यांदा माझ्या मनात प्रश्न उठला, की गीतेमध्ये गोष्टी तर फार छान सांगितल्या आहेत. कशाने काय होते? काय करायला पाहिजे? पण त्या धारणायुक्त गोष्टी आपण आचरणात आणू शकत नाहीत. कारण? कारण हेच की त्या सांगण्याऱ्या व्यक्तीला देह-अभिमान एवढा आहे, की त्यामुळे त्याच्या हे लक्षातच येत नाही आपण काय सांगतोय ते प्रत्यक्षात आणतोय का ते! म्हणूनच म्हटले आपल्याला राग येतोय म्हणजे आपल्यात देहाचा अभिमान कमी आहे की जास्त? विचार करा. हे कमी करायला किंवा घालवण्यासाठी आत्मिक भान याचा अभ्यास करावा लागेल. आपण रोजची जी मुरली ऐकतो, ती मुरली आपल्याला दिवसभरात आठवते का हो? मला सांगा तुम्ही सेंटरला येता, गावोगावी बहिणी लोक जाऊन मुरली क्लास घेतात. टोली देतात (प्रसाद वाटतात) ज्ञानापेक्षा जास्त काय आवडते तुम्हाला? दादींची टोली की बोली? सेंटरवर टोली खाणे प्रत्येकाला आवडतेच. समजा रोज प्रेमाने बोलणाऱ्या दीदीने काही कारणाने तुम्हला रागे भरले, तर तुम्हाला काय लक्षात राहील? एवढी वर्षे प्रेमाने बोलणारी दीदी आठवेल की १ दिवस रागवले ते? प्रेमाचे बोल लक्षात राहावे की रागाचे? आपण काय करतो? विसरायच्या गोष्टीच लक्षात ठेवतो. बघा दीदीने किती वेळा प्रेमाने बोलले असेल, किती वेळा टोली खाऊ घातली असेल, आठवणीने टोली घरीही पाठवली असेल - हे सर्व विसरून एक वेळचे रागे भरणे लक्षात ठेवतात. ही कुणाची कमतरता आहे सांगा बरे? वाईट गोष्टींना पकडून ठेवायची जी सवय आहे. ती सवय सोडावी लागेल. हो ना! विचार करा आणि परिवर्तनाच्या प्रक्रियेत जोम भरा.

***

## सुविचार

+ ह्या सांसारिक जगतरुपी नाटकाचे प्रत्येक दृश्य कल्याणकारी समजल्यानेच स्थिती अचल-अडोल राहील.
+ परमात्म्याच्या आठवणीत राहून कर्म केल्यास विकर्म बनणार नाहीत.
+ रुप न बघता, रुह (आत्म्याला) ला बघाल तर सर्वत्र आत्मिकतेचा सुगंध पसरवाल.
+ दिव्य गुणांच्या आधारे विचार करणे, बोलणे आणि कर्म करणे हीच दिव्यता होय.
+ योग्य संगत आयुष्यात पुढे जाण्यासाठी बळ आणि हिंमत देत असते.